४।।१८२३

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. २५

बालोपयोगी इतिहासमाला-२

सचित्र

# पेशवाईची हकीकत.

लेखक व प्रकाशक

वासुदेव गोविंद आपटे बी. ए.

संपादक आनंद, पुणें.

मुद्रक

केशव रावजी गोंधळेकर

जगद्धितेच्छु छापखाना, पुणें.

१९१३

दुसरी सचित्र आवृत्ति.

किंमत चार आणे.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

पहिल्या आवृत्तीवरून घरच्या लहान मुलांना शिकवितांना अडचणी अनुभवास आल्या त्या लक्षांत घेऊन व मुंबई खात्याचे विद्याखात्याचे मे० डायरेक्टर साहेब यांनीं ज्या सुधा- णा सुचविल्या, त्यांवरून ही सुधारलेली दुसरी आवृत्ति तयार केली आहे. हींत भाषा अधिक सोपी केली असून श्री. थोरले माधवराव पेशव्यांचें चित्र व श्री. सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीच्या (म्हणजे मराठ्यांच्या उत्कर्षाचा कळस झाला त्या वेळच्या) मराठी राज्याचा विस्तार दाखविणारा नकाशा हीं नव्यानें घातलीं आहेत.

पुणें. आनंदकार्यालय } वा० गो० आपटे.

## अनुक्रमणिका.


पहिले चार शब्द ... ...
१—लेखणी आणि तलवार ... ...
२—जिवास जीव देणारा मित्र ...
३—जवानमर्द बाजीराव ...
४—इमानी आणि कर्तबगारीचीं माणसें
५—' राखो बाजी लाज '


निं
यांचें
सरदार
आर आहे.
महत्त्वाचा
पेशव्यांच्या
१८१८ मध्यें
दुसरे बाजीराव
जाऊन राहिले

६—वसईचा मोहरा ... ...
,, ७—एक राजकारणी साधु ... ...
,, ८—एक रत्न हरपलें ... ...
,, ९—यादवी माजली ... ...
,, १०—वादळापूर्वीची शांतता ... ... २
,, ११—मराठेशाहीवरलें अरिष्ट ... ... २
,, १२—थोरले माधवराव पेशवे ... ... ३०
१३—याचें नांव बाणेदारपणा! ... ... ३३
१४—सर्वांत मोठा पेशवा ... ... ३५
१५—साडेतीन शहाणे ... ... ३७
, १६—या वेळचीं कांहीं ठळक माणसें ... ... ४०
, १७—ही सारी भाऊबंदकी ! ... ... ४५
,, १८—बारभाईचें कारस्थान ... ... ४६
,, १९—टोपीवाले ... ... ४७
,, २०—‘ आणरे माझी तलवार ’ ... ... ४९
,, २१—दोन थाटाचे समारभ ... ... ५१
, २२—नानाचा कारभार ... ... ५३
३—मराठ्यांच्या वैभवाचा कळस ... ... ५६
—आकस्मिक प्रसंग ... ... ५९
ाराच गोंधळ ... ... ६२
ापाचाच किता मुलानें उचलला ! ... ६५
ूट फोडली ... ... ६७
चकजी डेंगळे ... ... ६८
ईतला शेवटला ब्राह्मण वीर... ... ७०
ंतर ... ... ७१
ायाचें ! ... ... ७२

# पेशवाईची हकीकत.

## पहिले चार शब्द.

पहिल्या भागांत श्रीशिवाजी महाराज आणि त्यांच्या मागून झालेले मराठे राजे यांची हकीकत सांगतांना शाहु महाराजांच्या वेळेपर्यंत ती बरीच विस्तारानें सांगितली, आणि पुढची हकीकत अगदीं थोडक्यांत आणिली तुमच्या लक्ष्यांत आलेंच असेल. असें करण्याचें कारण, शाहु महाराज स्वतः राज्यकारभाराचे कामांत फारसें लक्ष घालीत नसत व त्यांच्या मागून झालेल्या राजांच्या हातांत अधिकार फारसे नसत. ते सगळे पेशव्यांच्या हातांत गेले होते. मराठे राजांच्या संबंधानें सांगण्याला कांहीं राहिलेंच नव्हतें. यापुढें सांगावयाचें ते सगळें पेशवे आणि शिंदे, होळकर वगैरे मराठे सरदार त्यांच्याविषयीं. तें या दुसऱ्या भागांत मी सांगणार आहें. मराठ्यांच्या इतिहासाचा हा भाग फारच महत्त्वाचा आहे. या भागालाच 'पेशवाई' म्हणतात. पेशव्यांच्या हातांत राज्याची सत्ता आल्यापासून तों सन १८१८ मध्यें मराठ्यांचें राज्य इंग्रजांच्या हातीं देऊन दुसरे बाजीराव हे 'हरि हरि' म्हणत ब्रह्मावर्त येथें जाऊन राहिले

तेथपर्यंतचा जो काळ ती पेशवाई. या पेशवाई
आतां नीट लक्ष देऊन ऐका. मागच्या पुढच्या...
संबंध ध्यानांत ठेवा; मराठी राज्याला चांगले
आले ते कोणत्या कारणामुळें, व पुढें वाईट दिवस
ते कोणत्या कारणामुळें हें नीट पहा; म्हणजे मरा
च्या ( अर्थात् आपल्या स्वतःच्याच ) इतिहासांतल्य
गोष्टी ऐकल्यापासून आपणांस पुष्कळ नवें ज्ञान झालें
पुष्कळ करमणूक झाली, आणि शिकण्यासारखें पुष्कळ
नवें कळलें असें तुमचें तुम्हांलाच दिसून येईल. हें कळणे
हाच इतिहास शिकण्याचा खरा उद्देश आहे. असो
पेशवाईची हकीकत सांगावयाची म्हणजे अगोद

## पेशवे कोण ?

हें सांगितलें पाहिजे.

तुमच्यांपैकीं पुष्कळांची समजूत अशी असेल कीं
ज्याप्रमाणें रानडे, गोखले, भागवत, पिंगळे वगैरे आ
नांवें ब्राह्मणांत आहेत, तसेंच ' पेशवे ' हें एक आडन
असेल. पुढें पुढें तें आडनांव होऊन बसलें खरें; पण मूळ
तें कांहीं तसें नव्हतें. ज्याप्रमाणें मामलेदार, किल्लेद
देसाई, सबनीस वगैरे मूळचीं हुद्यांचीं नांवें पुढें आड
होऊन बसलीं, तसेंच ' पेशवे ' हें हुद्याचें नांव
आडनांव झालें. मूळ शब्द ' पेशवा ' हा आहे, अ
तो फारशी आहे. त्याचा अर्थ प्रधान. त्यावरून शिव

च्या प्रधानाला ' पेशवा ' म्हणूं लागले. हें नांव महाराजांना राज्याभिषेक होईपर्यंत चाललें राजांनीं ह्यांचीं सगळीं नांवें फारशी नेसाहेबरून संस्कृत किंवा मराठी केलीं, तेव्हां ला म्हणजे पेशव्याला ' पंतप्रधान ' हें नवें नांव मिळालें. तथापि ' पेशवा ' हें जुनें नांव लोकांच्या तोंडीं फार दिवस बसलें होतें, तें कांहीं केल्या निघालें नाहीं. कागदोपत्रीं ' पंतप्रधान ' असें नांव लिहीत, पण लोक ' पेशवा 'च म्हणत.

शिवाजी महाराजांचे अगदीं पहिले प्रधान ( पेशवा) शामराजपंत रांझेकर हे होते. त्यांचे मागून मोरोपंत पिंगळे व त्यांच्या नंतर त्याचा मुलगा बहिरोपंत व भाऊ ळोपंत हे झाले. कांहीं दिवस तें काम किन्हईकर तिनिधि यांच्याकडेही आलें होतें. शेवटीं शाहुमहाराचे वेळीं कोंकणांत श्रीवर्धन येथें राहणारे चित्पावन ह्मण बाळाजी विश्वनाथ भट्ट यांना तें काम मिळालें. हांपासून इ. स १८१८ पर्यंत तें भट्ट वंशांतच राहिलें.

## पेशव्यांचीं नांवें.

या भट्ट घराण्यांत एकंदर सात पुरुष पेशव्याच्या दीवर बसले. त्यांचीं नांवें—१ बाळाजी विश्वनाथ, २ जीराव बल्लाळ ( पहिले बाजीराव ), ३ बाळाजी जीराव ( नानासाहेब ), ४ माधवराव उर्फ रावसा-, ५ नारायणराव [ नारायणराव मारले गेल्यानंतर

त्यांचे चुलते रघुनाथराव उर्फ राघोबा ( दादासाहेब)
हे फारच थोडे दिवस पेशवे होते. ६ माधवराव
नारायण ( सवाई माधवराव )आणि ७ दुसरे बाजीराव.

बाळाजी विश्वनाथाला पेशव्याचें काम इ.स.१७१
चे अखेरीस मिळालें. हा पेशवाईचा खरा प्रारंभ
धरतात. कारण कीं, त्या पूर्वीं जरी शामराजपंत, मोरोपंत
वगैरे पुरुष पेशवे होते व ते पराक्रमांत किंवा शहाण-
पणांत कमी नव्हते, तरी मराठे राजांच्या पुढें त्यांचें
तेज पडलें नाहीं. यामुळें त्यांची कर्तबगारी लोकांच्या
नजरेला स्पष्टपणें आली नाहीं. सूर्याच्या प्रकाशांत
नक्षत्रांचा प्रकाश दिसत सुद्धां नाहीं, तसें बाळाजीच्या
अगोदरच्या पेशव्यांचें झालें होतें. पेशव्यांची खरी
हुषारी व पराक्रम हीं बाळाजी विश्वनाथापासून पुढें दिसूं
लागलीं. पेशवाईला प्रारंभ इ.स.१७१४ पासून धरतात
तो याचसाठीं. हा पेशवाईचा प्रारंभ आणि इ.स.
१८१८ मध्यें झालेला तिचा शेवट, या दोन टोकां-
च्यामध्यें १०४ वर्षें गेलीं. पेशवाईची हकीकत म्हणजे
अर्थात् या १०४ वर्षांचा इतिहास. हा तुह्मांला आतां
मीं सांगतों ऐका.

---

## गोष्ट १ ली—लेखणी आणि तलवार यांची मेळ

बाळाजी विश्वनाथ हे कोंकणांत श्रीवर्धन येथें कुळ-
कर्णीपणाचें काम करीत होते. येथें जंजिऱ्याच्या शिद्दी

द    । राज्य असे. आपल्या विरुद्ध खटपटी करण्यांत बाळाजीच्या भावाचें अंग आहे असा संशय येऊन शिद्द्यानें त्याला पोत्यांत घालून समुद्रांत बुडविलें ... तेव्हां न जाणो, आपणालाही एकादे दिवशीं अशीच भयंकर शिक्षा होईल, अशी भीति वाटून बा... ...ानें कोंकण सोडिलें, आणि देशावर येऊन सेना... ...ते धनाजी जाधव यांचे पदरीं कारकुनाची नोकरी ...ली. हुशार माणसाला आपल्या अंगची हुषारी दाख-वण्याचे प्रसंग मिळत गेले, ह्मणजे त्याची खरी परीक्षा होते. बाळाजीला असे प्रसंग पुष्कळ मिळाले. त्यामुळें त्याची हुषारी जाधवाच्या व शाहुमहाराजाच्या नजरेला आली. कित्येक प्रसंगीं तर शाहुमहाराजांच्या तो फारच उप-... ..., त्यावरून महाराजांनीं त्याला आपला पेशवा ... . ही एवढी मोठी जागा एकदम मिळ-ण्याला आणखी एक कारण असें झालें कीं, शाहुमहा-राज व ताराबाई यांच्यामध्यें राज्याच्या मालकीबद्दल तंटे लागले होते. या तंट्यांत कुलाब्याचे आंग्रे शाहुमहा-राजांच्या उलट पक्षाला ह्मणजे ताराबाईला मिळाले होते. आंग्र्यासारखा मोठा पराक्रमी सरदार ताराबाईला मिळा-ला; तेव्हां शाहुमहाराजाला काळजी येऊन पडली, व त्यांनीं पेशवा बहिरोपंत याला आंग्र्यावर पाठविलें. पण आंग्र्यानें त्या पेशव्याला कैद करून नेलें, तेव्हां महाराज फारच घाबरले व अशा वेळीं करील तर बाळाजीच

आपलें काम करील असें वाटून त्यांनीं त्याला सैन्य देऊन पाठविलें. बाळाजीनें पिंगळ्यांची सुटका केली इतकेंच नाहीं, तर खुद्द आंग्र्याला महाराजांच्या पक्षाला वळवून आणिलें. ही मोठीच कामगिरी बाळाजीपंतानें केली आणि तिच्याबद्दल महाराजांनीं त्याला पेशव्याचें काम संतोषानें दिलें. बाळाजीपंत कोंकणांतून आले, तेव्हां त्यांनीं बरोबर आपले मित्र बाळाजीपंत भानु यांस आणिलें होतें. पेशव्याचें मोठें पद मिळाल्यावर बाळाजी विश्वनाथ आपल्या मित्राला विसरले नाहींत. त्यांनीं त्याला आपल्या हाताखालीं फडनिशीचें काम दिलें.

पेशव्याचें काम मिळाल्यावर बाळाजीपंतांनीं शाहूचे शत्रु युक्तीयुक्तीनें नाहींसे केले. कोणीं सरदारानें दंगा केला, ह्मणजे शक्ति असल्यास त्याला दडपून टाकावें किंवा तितकी शक्ति नसली तर युक्तीनें त्याला आपलासा करून घ्यावा, अशा रीतीनें त्यांनीं मोठ्या शहाणपणानें राज्यकारभार केला. एकदां तर खुद्द दिल्लीवर स्वारी करून जाण्याचा प्रसंग त्यांना आला. तो असा- दिल्लीच्या बादशहाचे दरबारांत या वेळीं दोघा सय्यद बंधूंचें प्रस्थ फार माजलें होतें. ते करतील ती पूर्व दिशा होती. बादशहाचें त्यांचेपुढें चालेनासें झालें होतें. ही स्थिति बादशहाला आवडेना. तेव्हां त्यानें त्यांतल्या एका सय्यदाला दक्षिणच्या सुभेदारीवर पाठविलें, आणि त्याला ठार मारण्याविषयीं तिकडच्या दुसऱ्या

सरदाराला आंतून लिहून पाठविलें. तो त्याला मार-ण्याचा बेत फसला. तरी पण त्या सय्यदाला आपल्या जिवाची भीती वाटे. ह्मणून त्यानें शाहूमहाराजापाशीं मदत मागितली. दक्षिणचे कांहीं प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी हे हक्क आणि स्वराज्याची सनद देण्याचें त्याचेपासून कबूल करून घेऊन बाळाजीपंत सैन्य घेऊन दिल्लीपर्यंत त्याच्या मदतीला गेले. त्यामुळें तेथें सय्यदाची छाप पुनः चांगली बसली. तेव्हां कबूल केलेले हक्क व स्वराज्य यांच्या सनदा त्या सय्यदानें बादशहाकडून पेशव्यास देवविल्या. ही कामगिरी अर्थात् तलवारीच्या जोरावर बाळाजीनें केली. बाळाजीला जशी लेखणी तशी तलवारही चांगली धरतां येत होती. त्यानें तलवारीच्या जोरावर जसे नवे हक्क मिळविले, तसे लेखणीच्या जोरावर राज्याच्या जमाबंदीची ( जमिनीच्या वसुलाची ) चांगली व्यवस्थाही केली. हा पेशवा मोठा बुद्धिमान्, शहाणा व धोरणी होता.

---

## गोष्ट २ री—जिवास जीव देणारा मित्र.

मराठ्यांना चौथाई सरदेशमुखीचे हक्क व स्वराज्य यांच्या सनदा बादशहा देणार हें दिल्लीच्या दरबारीं पुष्कळांना आवडलें नाहीं. पेशवे त्या सनदा घेऊन दरबारांतून निघाले, म्हणजे गर्दी करून त्यांचे हातून त्या हिसकावून घ्याव्या असा त्यांनीं बेत केला. बाळाजीला

हा बेत कळला, तेव्हां त्याला थोडीशी काळजी वाटूं लागली. ' आतां मसलत कशी ? ' असें त्यांनीं आपले जिवलग मित्र बाळाजीपंत भानु यांस विचारलें. त्यांनीं उत्तर केलें, ' कांहीं चिंता नाहीं. मी तुमच्या पालखींत बसून जातों. तुम्ही सनदा खाकेंत मारून दुसऱ्या वाटेनें जावें. ' एवढ्या मोठ्या श्रमानें मिळविलेल्या सनदा हातच्या न घालविण्याला बाळाजीला दुसरा कांहीं उपाय दिसला नाहीं. म्हणून त्यानें तें कबूल केलें. ठरल्या-प्रमाणें सनदा देण्याचा दरबार झाल्यावर बाळाजीपंत भानु पेशव्याचा पोषाख अंगावर घालून पालखींत बसले, आणि खरे पेशवे बाळाजी विश्वनाथ सनदा खाकेस मारून एखाद्या सामान्य माणसासारखे मुकाट्यानें दुस-ऱ्या वाटेनें निघून गेले. सनदा हिसकावण्यासाठीं टपून बसलेल्या लोकांनीं भानु बसले होते त्या पालखीवर हल्ला केला. त्या गर्दींत भानु हे ठार झाले. पण सनदा बचावल्या. याप्रमाणें पेशव्याच्या जिवावर प्रसंग येऊन बेतला होता, तेव्हां भानु हे त्यांच्या उपयोगीं पडले. मराठी राज्या-साठीं आपला जीव धोक्यांत घालणाऱ्या दोघा ब्राह्मणांचे ( पेशवे व भानु यांचे ) वंशजही पुढें त्यांचे सारखेच निघाले. म्हणून पेशवाईची भरभराट होऊन ती शंभर वर्षें तरी टिकली.

बाळाजी विश्वनाथ सनदा घेऊन निघाले, ते साता-ऱ्यास सुखरूप येऊन पोहोंचले. त्यांनीं आणिलेल्या

सनदा महाराजांचे चरणापाशीं ठेविल्या, तेव्हां महाराज फार खुष झाले. यानंतर पेशव्यांनीं राज्यांतल्या वसुलाची नीट व्यवस्था लावण्यांत व लोकांना सुख होईल अशा गोष्टी करण्यांत आपलें सारें लक्ष घातलें. बाळाजी स. १७२० मध्यें मरण पावला. यानें सात वर्षे पेशव्याचें काम फार चांगल्या प्रकारें केलें. त्याला बाजीराव व चिमाजीआप्पा असे दोन मुलगे होते. एकाच माणसाचे अंगीं मुत्सद्दीपणा व धाडस हे दोन्ही गुण क्वचित् असतात, पण बाळाजीच्या अंगीं हे होते.

---

## गोष्ट ३ री—जवानमर्द बाजीराव.

बाळाजीच्या मागें आपणाला पेशव्याचें काम मिळावें अशी त्याचा वडील मुलगा बाजीराव याची इच्छा होती, आणि ती त्याला मिळूं नये याविषयीं श्रीपतराव प्रतिनिधीची खटपट होती. कोणी म्हणतात कीं कोंकणस्थ व देशस्थ या दोन ब्राह्मणजातींत त्या वेळीं तंटे होते, ते या दोघांमधल्या द्वेषाला कारण झाले. तें कांहीं असो, येवढी गोष्ट खरी कीं, बाळाजी विश्वनाथाच्या मरणानंतर कित्येक दिवसपर्यंत पेशव्याची जागा रिकामी पडली होती. पण पुढें एका चमत्कारिक प्रसंगामुळें बाजीरावाच्या अंगचे गुण शाहुमहाराजाच्या नजरेस येऊन या प्रश्नाचा निकाल लागला व बाजीरावाला पेशव्याचीं वस्त्रें मिळालीं.

तो प्रसंग असा—निजामउल्मुल्क हा दक्षिणचा मुसलमान सुभेदार होता. तो व दिल्लीचा बादशहा यांच्यामध्यें कांहीं भांडण झाल्यावरून त्याला पकडण्यासाठीं दिल्लीहून फौज रवाना झाल्याची खबर आली. तेव्हां निजाम घाबरला आणि मराठ्यांची मदत मागूं लागला. शाहुमहाराजांनीं मदत देनों असें वचन दिलें, पण पदरच्या एकाही सरदारांत दिल्लीच्या फौजेशीं टक्कर देण्याचें अवसान दिसेना. सर्वांनीं हातपाय गाळले. मराठ्यांची अब्रू जाण्याची वेळ आली. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं महाराजांनीं बाजीरावाला दरबारांत बोलावून आणिलें, आणि तुमची हिंमत कशी काय आहे ? म्हणून विचारिलें. तेव्हां ‘ मोंगलांची कथा काय ? आज्ञा होईल तर प्रत्यक्ष काळाच्या दाढेंत जाऊन सरकारच्या पुण्यप्रतापेंकरून त्यांचा बंदोबस्त करून येईन ’ असें वीराला शोभणारें उत्तर बाजीरावानें केलें. तेव्हां त्याच्या अंगचें पाणी ओळखून महाराजांनीं लागलीच त्याला पेशव्याचीं वस्त्रें दिलीं. ही गोष्ट इ. स. १७२० मध्यें घडली.

बाजीरावानें सैन्याची तयारी करून एकदम दिल्लीकडे कूच केलें. कांहीं शक्ति आणि कांहीं युक्ति अशा दोन्ही उपायांनीं त्यांनीं निजामाला पाहिजे होती तशी मदत दिली. बादशहाच्या फौजेचा पराभव झाला. मराठ्यांचा दिल्लीपर्यंत वचक बसला. मराठ्यांचा फा-

यदी झाला. प्रतिनिधींचें तोंड बंद झालें. आणि बाजी-रावाची शाहूपाशीं चांगली छाप बसली.

या पुढें बाजीरावाला नेहेमीं मोहिमेवर राहण्याचेच प्रसंग येत गेले. त्याला तीन निरनिराळ्या पक्षांशीं भांडावें लागलें. पहिला कोल्हापूरकर व सेनापति दाभाडे यांचा ह्मणजे मराठ्यांचाच पक्ष; दुसरा मुसलमानांचा ह्मणजे निजाम व दिल्लीचे बादशहा यांचा; आणि तिसरा फिरंगी ( पोर्तुगीज ) लोकांचा. या पैकीं पहिल्या प-क्षाशीं झालेल्या तंट्यासंबंधानें येथें थोडेंसें सांगतों. बाकीच्याविषयीं पुढें सांगेन.

---

## कोल्हापूरकरांशीं भांडण.

आपल्याच लोकांनीं आपल्याच लोकांवर शस्त्र उच-लावयाचें आणि आपल्या भाईबंदाचे गळे कापावयाचे ह्मणजे फारच वाईट गोष्ट! महत्पाप! कारण कीं, त्यांत सर्वतोपरीं आपल्या हातून आपलेंच नुकसान होऊन तिसऱ्याला मात्र त्याचा फायदा करून घ्याव-याला फावतें. पण मनुष्य हट्टाला पेटला ह्मणजे ही गोष्ट त्याच्या ध्यानीं म नीं सुद्धां राहत नाहीं. कोल्हापूरप्रक-रणांत हाच प्रकार दिसून आला. मराठ्यांना निजामा-च्या राज्यांत चौथाईचा हक्क होता. ताराबाईच्या चि-थावणी वरून कोल्हापूरकर संभाजी यानें निजामाजवळ त्या हक्काचे पैसे मागितले. इकडे शाहुमहाराजातर्फें

बाजीरावानें पैशाची मागणी केली. एकाच गोष्टीवर दोन हक्कदार आपापले हक्क सांगू लागले. हें काय तें तंट्याचें मूळ. मराठे आपापसांत बरे भांडत आहेत, त्यांच्या भांडणाचा आपण फायदा घेऊं, असा विचार करून निजामानें कोल्हापूरकराकडून आपल्याला फायदेशीर अशा शर्ती कबूल करून घेतल्या, आणि मग तो बाजीरावाला गुरकावणीचीं उत्तरें देऊं लागला. बाजीरावाची तलवार उत्तर देण्याला बाहेर निघाली. तेव्हां ' खानेकू मैं, और लडनेकू मेरा भाई ' असें निजाम करूं लागला. फायदा आपण घ्यावयाचा आणि लढाईला कोल्हापूरकराला पुढें करावयाचें हा निजामाचा कावा. पण तो समजण्याइतकी अक्कल किंवा बाजीरावाशीं लढण्याइतका दम कोल्हापुरकराच्या अंगांत नसल्यामुळें त्यानें माघार घेतली. निजामाचें पारडें लागलींच फिरलें. त्यानें कोल्हापूरकराला दूर लोटून बाजीरावाच्या सगळ्या मागण्या मुकाट्यानें कबूल केल्या. तेव्हां कोल्हापुरकरांचा तंटा अर्थात् मिटला.

---

## गोष्ट ४ थी—इमानी आणि कर्तबगारीचीं माणसें.

बाजीराव पेशवे स्वतः पाणीदार, शूर आणि धन्याची चाकरी इमानानें बजावणारे होते. अर्थात् इमानी, छातीचीं, आणि कर्तबगारीची धमक बाळगणारीं गुणवान् माणसें त्यांना फार आवडत असत;

अशांना निवडून काढून ते मोठ्या योग्यतेस चढवीत. ग्वालेरच्या शिंदे घराण्याचा मूळपुरुष राणोजी व इंदुरच्या होळकरांच्या गादीचा मूळ पुरुष मल्हारराव हे यावेळीं अगदीं हलक्या कामावर होते. पण बाजीरावानें त्यांच्या अंगचे गुण पाहून त्यांना सरदार बनविलें. याशिवाय पोवार, नागपूरचे भोसले, व बडोद्याचे गायकवाड हेही यावेळीं चांगले उदयाला आले. शिंदे व होळकर हे आपले मालक पेशवे यांची चाकरी कशी करीत व त्यांचेवर बाजीरावाचा केवढा भरंवसा असे हें दाखविण्यासाठीं एक लहानशी गोष्ट सांगतों. मागच्या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें निजामानें बाजीरावाच्या मागण्या कबूल करून तंटा मिटविला, आणि मग मित्रत्वाच्या नात्यानें मेजवानीसाठीं म्हणून त्यांना आपल्या गोटांत बोलाविलें. निजामासारख्या दगलबाज शत्रूच्या गोटांत एकट्या दुकट्यानें मेजवानीला जावयाचें म्हणजे मोठीच धोक्याची गोष्ट! बंदोबस्ताकरितां बरोबर नागव्या तरवारींचे लोक घेऊन जावें तर तेंही वाईट दिसतें. असा पेंच पडला. पण बाजीराव छातीचा माणूस. त्यानें बरोबर फक्त दोन हुजरे घेतले. मेजवानीचा थाट उडाल्यानंतर खाजगी संभाषणाचे वेळीं निजाम बोलतां बोलतां सहज म्हणाला, ' बाजीरावसाहेब, आपणांस येथल्यायेथेंच जर मीं कैद केलें तर कसें होईल ? आपण सरदारीच्या पदाला चढविलेले शिंदे होळकर येथें

आपल्या उपयोगीं पडतील काय ?' बाजीरावानें न घाबरतां उत्तर केलें, 'अलबत् पडतील !' एवढें बोलून त्यानें आपल्या दोघां हुजऱ्यांकडे पाहिलें. त्याबरोबर राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर हुजऱ्याच्या वेषांत पेशव्याबरोबर गेले होते ते पुढें झाले. त्यांना पाहून निजाम फार खजिल झाला आणि ज्यांचे सरदार धन्याच्या जिवासाठीं जीव देण्याला इतके तयार आहेत, त्यांना कोठेंही भीति नाहीं असे उद्गार त्यानें काढले.

---

## गोष्ट ५ वी—'राखो बाजी लाज.'

निजाम पक्का कावेबाज होता. त्यानें जेथें तेथें बाजीरावाचे विरुद्ध कारस्थानें करावीं व मराठे सरदारांना त्याचे विरुद्ध चिथवावें. या खेपेला त्यानें सेनापति दाभाडे याला हातीं धरलें. दाभाडे बाजीरावाच्या विरुद्ध जाऊं लागले. बाजीरावानें अगोदर त्यांची नीट समजूत घालून पाहिली, पण ते ऐकेनात. तेव्हां लढाई केली. दाभाड्याला निजामाचा मोठा भरंवसा होता. पण त्या कावेबाजानें आयते वेळीं तोंड लपविलें. बडोद्यापाशीं दाभाड्याची बाजीरावाची जंगी लढाई झाली. तींत दाभाडे वर्मीं बाण लागून हत्तीवरून पडले. तेव्हां त्यांचें सैन्य घाबरून चोहोंकडे उधळलें, आणि बाजीरावाला जय मिळाला. या लढाईनंतर दाभाड्याच्या पदरचे सरदार—गायकवाड—हे पेशव्यापाशीं येऊन राहिले.

बाजीरावाच्या कारकीर्दींत निजामाशीं व मोगलांशीं पुष्कळ लढाया झाल्या, आणि त्यांत गुजराथ, माळवा, खानदेश वगैरे पुष्कळ प्रांत मराठ्यांना मिळाले. बाजीरावानें ते प्रांत शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे आपल्या सरदारांच्या स्वाधीन केले. बाजीरावाचे वेळीं निजामाची रग इतकी जिरली कीं, पुढें पांच पंचवीस वर्षांत त्याला मराठ्यांशीं युद्ध करण्याचें धैर्य झालें नाहीं. प्रत्येक लढाईत बाजीरावाला याप्रमाणें जय मिळत गेला, तेव्हां त्याच्या यशस्वी तलवारीची कीर्ति सगळ्या हिंदुस्थानभर झाली. याचवेळीं बुंदेलखंडांतल्या छत्रसाल नांवाच्या हिंदुराजावर बंगष नांवाच्या एका मोंगल सरदारानें स्वारी केली. मोगलाचें सैन्य मोठें, त्याच्यापुढें आपला काय टिकाव लागणार आहे? असे पाहून तो वृद्ध हिंदु राजा घाबरला, आणि त्यानें बाजीरावाला अतिशय काकुळतीचा निरोप पाठवून मदतीला बोलाविलें. या निरोपाबरोबर व्रजभाषेंत एक दोहा रचून त्यानें पाठविला होता. तो असा—

**" जो गति ग्राहगजेंद्रकी सोगत भई है आज**
**बाजी जात बुंदेलनकी राखो बाजी लाज. "**

[ अर्थः—जी अवस्था नक्रानें गजेंद्राची केली होती अशी पुराणांतरीं कथा आहे, तीच अवस्था आज माझी झाली आहे. बुंदेली लोकांची अब्रू जाण्याची वेळ आली आहे. बाजीरावसाहेब, आतां आमची लाज तुम्हीं राखावी. ]

मूर्ती फोडल्या, व लोकांना जुलमानें बाटवून ख्रिस्ती केलें, अशा बातम्या अप्पासाहेबांच्या कानीं गेल्या-बरोबर ते फिरंग्यांची खोड मोडण्यासाठीं निघाले. तळें, घोसाळें, रेवदंडा, बेलापूर, साष्टी वगैरे मुलुख घेत घेत ते वसईला आले. वसईच्या किल्ल्याभोंवतीं तीन बाजूंनीं समुद्र असून एका बाजूनें मात्र जमीन आहे. म्हणून हा किल्ला घेण्यासाठीं अप्पासाहेबानें जहाजें तयार करून त्याला वेढा दिला, आणि समुद्रांतून लढाई सुरू केली. फार दिवस लढाई चालली होती. फिरंग्यांच्या तोफांचा जबरदस्त मारा सुरू होता. मराठे तो मारा तोंडावर घेऊन लढत होते. केवढी जबर छाती ! मराठ्यांनीं लढण्याची शिकस्त केली, पण उपयोग झाला नाहीं. अतोनात माणसें मेलीं तरी किल्ला हातीं लागेना. अप्पासाहेबाचा तर निश्चय कीं, किल्ला घेईन तेव्हांच देशाला परत तोंड दाखवीन. लढतां लढतां अप्पाला मोठी जखम लागली. तरी तें दुःख बाजूला ठेवून त्यानें सरदारांना आपल्या जवळ बोलाविलें आणि म्हटलें, ‘ मी आतां मरणार. वसई हातीं घेण्याचा माझा हेतु राहून जाईल. यासाठीं तोफेच्या तोंडाशीं बांधून माझें डोकें तरी किल्ल्यांत पाडावें, ह्मणजे माझे हेतु सफल होतील. ’ त्यांचे हे शब्द ऐकून मराठ्यांना आवेश चढला. किल्ल्याच्या आंतली बातमी आणण्या-साठीं सरदार खंडोजी माणकर यानें गुराख्याचें,

आंजुरकर सरदारानें सुताराचें, व सरदार मोरे यानें कासाराचें अशीं सोंगें घेऊन किल्ल्याचे आंत शिरकाव केला, आणि आंत चोंहोंकडे हिंडून कोठें काय आहे त्याची बित्तंबातमी आणिली. मग जमिनीच्या बाजूनें सुरुंग खणून किल्ल्याचे बुरुजाखालीं लाविले, आणि दारूचे बुधले भरून बत्ती दिली. एक बुरुज उडाला, दुसरा उडाला, हें पाहून मराठ्यांनीं निकराचा हल्ला केला. फिरंगी जिवावर उदार होऊन लढले. मराठ्यांनीं पराक्रमाची शिकस्त केली. तेव्हां फिरंगी पळूं लागले. यावेळीं एक फिरंगी बाई मराठ्यांचे हातीं लागली होती. पण अप्पानें तिला अगदीं त्रास न देतां साडीचोळी देऊन तिच्या नवऱ्याकडे पोंचती केली. अप्पाचा किती थोरपणा हा! वसई सर झाली. अप्पासाहेबांची प्रतिज्ञा शेवटास गेली. ही गोष्ट १७३९ मध्यें घडली. मराठ्यांच्या या पराक्रमामुळें फिरंग्यांना त्यांचा दरारा वाटूं लागला. बाजीराव व चिमाजी अप्पा ही वीरांची जोडी पाहून लोक त्यांना रामलक्ष्मणाच्या जोडीप्रमाणें मानूं लागले.

---

## गोष्ट ७ वी—एक राजकारणी साधु.

बाजीरावानें थोडक्या वर्षांत गुजराथ, माळवा, खानदेश, वऱ्हाड, नागपूर, बंगाल व कर्नाटक इतके प्रांत जिंकून तेथें मराठ्यांचा अंमल चालू केला होता.

चिमाजीअप्पानें कोंकण प्रांताचा बराच भाग घेऊन फिरंग्यांचीं व जंजिरेकर शिद्दीचीं हाडें नरम केलीं होतीं. मराठ्यांनीं या वेळीं खुद्द दिल्लीच्या बादशहाला कांपावयास लाविलें होतें. मराठ्यांची तलवार जी इतकी गाजली, आणि त्यांच्या राजकारणाला चोहीकडे यश आलें, त्याच्या मुळाशीं मराठे सरदारांचा देशाभिमान तर खराच, पण त्याशिवाय एका मोठ्या राजकारणी साधूचा आशिर्वाद व मदत हेंही एक कारण होतें. ब्रम्हेंद्रस्वामी नांवाचे एक मोठे सत्पुरुष यावेळीं कोंकणप्रांतीं होते. हे मूळचे वऱ्हाडांत राजुरी येथील राहणारे. पण पुढें तीर्थयात्रा करून आल्यावर कोंकणांत चिपळूण येथें त्यांनीं आपलें ठिकाण केलें होतें. बाजीराव व चिमाजीअप्पा या दोघां भावांची त्यांचे ठायीं फार श्रद्धा होती. रामदासस्वामी ज्याप्रमाणें साधु असून राजकीय बाबतींत मन घालीत, व श्रीशिवाजीमहाराजांना वेळोवेळीं योग्य सल्लामसलत व उत्तेजन देऊन त्यांचे कडून मराठी राज्याची उभारणी करीत, त्याप्रमाणें ब्रह्मेंद्र स्वामीही शाहुमहाराज, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, आंग्रे, पवार, होळकर वगैरे प्रमुख मराठ्यांना शत्रूच्या मनसब्यांतले नाजूक डावपेंच वेळोवेळीं समजावून देत, व ते हाणून पाडण्याच्या युक्त्या सुचवीत. इतकेंच नाहीं, तर भिक्षा मागून जमा केलेल्या द्रव्यांतून अडचणीचे वेळीं त्यांना मोठमोठाल्या रकमाही कर्जाऊ

देत. बाजीरावाची नेहमीं कोठेंना कोठें तरी मोहीम सुरू असल्यामुळें त्याना फौजेचा पगार देण्याचे वेळीं पैशाची गरज लागे. अशा वेळीं कर्ज काढण्याची पाळी येई. पुष्कळ वेळां सावकाराकडून कर्जाऊ रक्कम मिळेना. अशा प्रसंगीं स्वामी हटकून त्याच्या उपयोगी पडत. याशिवाय मराठे वीर युद्धाला निघाले ह्मणजे स्वामी त्यांना एकादें वस्त्र, शस्त्र, व प्रेमपूर्ण आशिर्वाद देत. स्वामींचा आशिर्वाद व्यर्थ होणार नाहीं अशी श्रद्धा मराठ्यांचे ठायीं असल्यामुळें तो खरा करण्यासाठीं ते जीवावर उदार होऊन लढत व यश मिळवीत. ब्रह्मेंद्र स्वामी हबशी, फिरंगी व इंग्रज या तिघांशीं सख्य ठेवीत; मराठ्यांना राजकारणांत ज्या अडचणी येत, त्या स्वामींच्या साह्यानें पुष्कळ वेळां दूर करतां येत. समर्थ रामदास व ब्रह्मेंद्र स्वामी हे दोन राजकारणी साधु महाराष्ट्रांत जसे झाले, तसे अन्य देशांत क्वचित्च झाले असतील.

## गोष्ट ८ वी—एक रत्न हरपलें.

हिंदुस्थानांतल्या बहुतेक ठळक ठळक प्रांतांत तरवार गाजवून बाजीरावाची स्वारी परत महाराष्ट्रांत आली, आणि थोडीशी विश्रांति घेणार, इतक्यांत खबर आली कीं, इराणचा बादशहा नादिरशहा जंगी फौज घेऊन दिल्लीवर उतरला आहे व त्यानें लुटालूट आणि कत्तली

कत्तल चालविली आहे. मग कसली विश्रांति आणि कसचें काय ? लागलींच दोन लक्ष फौज जमा करून व ठळक ठळक सरदारांना बरोबर घेऊन पेशव्याची स्वारी दिल्लीस जावयास निघाली. इराणाहून मी मी करीत आलेल्या या शहाला चांगला ठेचून मराठ्यांचा झेंडा अटकेला लावावा ही बाजीरावाची इच्छा. पण ती पुरी व्हावी असा ईश्वरी संकेत नव्हता. वाटेंत नर्मदेच्या क़ांठीं रावेर मुक्कामीं नवज्वरानें बाजीराव मरण पावले ( १७४० ). बाजीरावासारखें रत्न नाहींसें झाल्यानें मराठ्यांचें फार नुकसान झालें.

मराठ्यांच्या इतिहासांत जे नामांकित शूर पुरुष होऊन गेले, त्यांत बाजीराव प्रमुख म्हटले पाहिजेत. मोगल बादशाही बुडवून हिंदुस्थानभर मराठ्यांचें राज्य करावें हा त्यांचा फार हेतु होता, आणि परमेश्वरानें त्यांना अधिक आयुष्य दिलें असतें तर त्यांनीं तो हेतु तडीलाही नेला असता. बाजीरावाच्या मागें त्यांचे बंधु चिमाजीअप्पा हे फार दिवस जगले नाहींत. सात आठ महिन्यांनीं तेही वारले.

बाजीरावाच्या अंगचें शौर्य व धमक पाहून शाहू-महाराज फार खुष असत. पेशव्यांना सगळ्या प्रांतांशीं व्यवहार करावा लागे, व सर्वांवर नजर ठेवणें भाग पडे. यासाठीं त्यांना राहण्याला पुण्यासारखें मध्यवर्तीचें ठिकाण सोईचें पाहून तेथें वाडा बांधण्याविषयीं महारा-

जांनीं पेशव्यांना परवानगी दिली, व तेव्हांपासून पेशवे पुण्यास राहूं लागले. तोंपर्यंत त्यांचें राहणें सासवड, पुरंदर, सुपें, किंवा सातारा यांपैकीं कोणत्या तरी ठिकाणीं असे. पुण्यांतल्या पेशव्यांच्या मुख्य वाड्याला शनिवारवाडा म्हणतात.

बाजीरावाला तीन मुलगे होते. मोठा बाळाजी ऊर्फ नानासाहेब, मधला रघुनाथराव ऊर्फ राघोबा दादा ( दादासाहेब ) आणि धाकटा जनार्दन ( हा लहानपणीं वारला ). चिमाजी अप्पास सदाशिवराव भाऊ हा एकटाच मुलगा होता.

## गोष्ट ९ वी—यादवी माजली.

बाजीराव मरण पावल्यावर चिमाजी अप्पा बाळाजी ऊर्फ नानासाहेब याला पेशव्याचीं वस्त्रें देवविण्यासाठीं साताऱ्यास घेऊन गेले. मागें बाजीरावाला पेशवाई मिळूं नये म्हणून प्रतिनिधि आड आले होते, तसे यावेळीं नागपूरकर रघोजी भोंसले हे आले. पण बाजीरावाच्या कामगिरीचें शाहूमहाराजाला चांगलें स्मरण होतें. तेव्हां त्याच्या प्रत्यक्ष मुलाला पेशव्याचीं वस्त्रें आम्ही देत नाहीं असें त्यांच्यानें म्हणवेना. शिवाय बाळाजी लहानपणापासूनच मोठा शहाणा, बुद्धिमान् आणि धोरणी दिसत होता. म्हणून महाराजांनीं कोणाचें न ऐकतां त्याला पेशवा केलें. ( इ. स. १७४० ).

पेशव्याचें काम मिळतांच नानासाहेबानें दक्षिण कोंकण, व उत्तर हिंदुस्थान या प्रांतांतून स्वाऱ्या केल्या व पुष्कळ नवीन मुलुख मिळविला. नंतर नगरचा किल्ला युक्तीनें हस्तगत केल्यावर ते कर्नाटकाकडे वळले. तेथेंही त्यांनीं नवा प्रांत काबीज केला. पण मग कांहीं गडबडीमुळें त्यांना लवकर पुण्यास परत यावें लागलें. ही गडबड म्हणजे मराठ्यांमध्यें आपसांत माजलेले तंटे होत. त्यावेळीं इकडे कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. ताराबाईचें आणि शाहूचें पक्कें वांकडें होतें. नानासाहेबालाही ती पाण्यांत पहात होती. नागपूरकर भोंसले हे पूर्वींपासूनच उघडपणें पेशव्याचें शत्रुत्व करीत होते. ते केव्हां निजामाला मिळत, केव्हां ताराबाईच्या मदतीनें पेशव्यांचे विरुद्ध कारस्थानें करीत. प्रतिनिधि, आंग्रे, व गायकवाड हेही पेशव्यांच्या वाईटावर होते. नानासाहेब या सगळ्यांना ओळखून होते आणि एकेकाची खोड मोडण्याचा त्यांचा विचार होता. इ. स. १७४२ मध्यें त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत स्वारी केली, ते वेळीं मुसलमानांना मदत देऊन त्यांनीं नागपूरकराचा पराभव करविला. पेशव्यांनीं हें फार वाईट उदाहरण घालून दिलें. खरें पाहिलें तर पेशवेही मराठे व नागपूरकर भोंसलेही मराठे. मराठ्यांनीं मराठ्यांना साह्य करून मराठ्यांचें राज्य वाढवावयाचें, तें एकीकडेच राहून ते आपापसांतच भांडून तिसऱ्याच्या मदतीनें एकमेकांचा नाश

करण्यास तयार झाले याला काय म्हणावें ? स्वतःच्या भांडणांत परक्याचा हात शिरकविल्याचें पेशव्यांचें हें उदाहरण पाहून दुसऱ्या सरदारांनीं पुढें तेंच केलें; आणि मराठ्यांचें राज्य बुडण्याला तें एक मोठें कारण झालें.

इतक्यांत इ. स. १७४८ त शाहुमहाराज मरण पावले. त्यांना मूलबाळ कांहीं नव्हतें. त्यामुळें त्यांच्या-मागें सातारच्या गादीवर कोणीं बसावें या विषयीं वाद उत्पन्न झाला. ताराबाईचें म्हणणें कीं, आपला नातु रामराजा याला शाहूची बायको सकवारबाई हिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवानें आपण सगळा कारभार पहावा. सकवारबाईला वाटे कीं, आपल्या नव-ऱ्याच्यामागें आपण राज्याची धनीण व्हावें. पण तारा-बाई आणि पेशवे यांच्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं हें तिला दिसत होतेंच. म्हणून शाहुमहाराज मरतांच ती त्यांच्याबरोबर सती गेली. आतां खरें भांडण ताराबाई व पेशवे यांच्यामध्येंच राहिलें. आपल्यामागें रामराजानें गादीवर बसावें व पेशव्यांनीं कारभार करावा अशी शाहुमहाराजांची स्वतःची इच्छा होती, व त्या-प्रमाणें त्यांनीं मरतांना पेशव्याला सनदही लिहून दिली होती. त्यांच्या इच्छेप्रमाणें रामराजाला गादीवर बस-विण्यांत आलें व पेशवे कारभार पाहूं लागले. पण ताराबाई स्वस्थ बसेना. तिनें गायकवाडाला फौज घेऊन

मदतीला बोलाविलें. ते आले, पण पेशव्यांनीं त्याला अटकेंत ठेविलें. सातान्यास अशीं कारस्थानें नेहमीं चालत; या कटकटीस्तव पेशव्यांनीं आपलें राहणें पुण्यास ठेविलें. शनिवारचा वाडा बांधून तयार झाला होता, तेथें ते येऊन राहूं लागले. यापुढें मराठे राजे सातान्यास व पेशवे पुण्यास राहत, व सगळा कारभार पुण्याहून सातारच्या महाराजाच्या नांवानें चाले.

---

## गोष्ट १० वी—वादळापूर्वीची शांतता.

घरांतल्या घरांत ताराबाई, नागपूरकर भोंसले, गायकवाड, प्रतिनिधि वगैरे सारखे अनेक शत्रु असून नानासाहेबांनीं लवकरच त्या सर्वांवर आपली छाप बसविली हें कांहीं सामान्य बुद्धीचें लक्षण नव्हतें. बाहेरच्या शत्रूंनाही नानासाहेबांनीं चांगलें वठणीला आणिलें. स्वत: पेशव्यांनीं व त्यांच्या शूर भावांनीं कर्नाटकांत म्हैसूरकडे स्वाऱ्या करून तो मुलुख जिंकला. राघोबादादा, मल्हारराव होळकर, जयाप्पा शिंदे, विंचूरकर, पटवर्धन वगैरे मराठे वीर जिकडे जात तिकडे फत्ते करीत. राजपुताना, पंजाब, रोहिलखंड वगैरे प्रांतांत मराठ्यांनीं आपली सत्ता यावेळीं चांगली बसविली होती. त्यांनीं भीमथडीच्या तट्टांना अटकेचें पाणी पाजलें होतें. निजामासारखा मोंगल सरदार काय, पण खुद्द दिल्लीचा बादशहा मराठ्यांना भिऊं लागला होता. मराठ्यांकडे

वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची छाती नव्हती. जिंकलेल्या प्रांतांतून आणिलेल्या लुटीनें मराठ्यांचा खजिना भरपूर भरलेला होता. नवीन मिळविलेल्या प्रांतांच्या बंदोबस्तासाठीं पेशव्यांनीं नवे सरदार केले होते. मराठ्यांचें हें वैभव पाहून इतरांचे डोळे दिपत. नानासाहेबांच्या कारकीर्दींत विद्वान् ब्राह्मण, उत्तम कवि, नामांकित गवई, कुशल कारागीर वगैरेंचीही संभावना यथास्थित होत असे. व्यापार, शेतकी, कला, वगैरे लोकोपयोगी धंद्यांनाही चांगल्या सवलती देण्यांत येत. त्यावेळीं महाराष्ट्रांत व बाहेर सर्वत्र शांतता नांदत होती, व लोक सुखाचा अनुभव घेऊं लागले होते. श्रीशिवाजी महाराजांनीं ज्या मराठी राज्याचा पाया आपल्या हातानें घातला होता, व ज्या पायावर राजाराम महाराजांचे कारकीर्दींत मराठे वीरांनीं टोलेजंग इमारत उठविली होती, तिच्यावर सोनेरी कळस चढविण्याचें श्रेय आपण घेतलें असा अभिमान व असें कौतुक यावेळीं प्रत्येक मराठ्यास वाटूं लागलें होतें. पण ही शांतता, हें वैभव, हा अभिमान क्षणिक आहे, लवकरच याचें उट्टें निघून सगळा महाराष्ट्र देश दुःखसागरांत बुडणार आहे; हें त्या वेळीं कोणाला ठाऊक होतें ?

---

## गोष्ट ११ वी—मराठेशाहीवरलें मोठें अरिष्ट.

मराठ्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून

अटकेपर्यंत झेंडे नाचविले हें मागल्या गोष्टींत मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. ही कामगिरी मुख्यतः राघोबादादाची होती. दादासाहेबांनीं अशा दूरदूरच्या स्वाऱ्या नेहमीं करीत रहावें, पुनः दक्षिणेंत यावें, पुनः दुसऱ्या स्वारीवर जावें, अशा नेहमीं भराऱ्या माराव्या यावरून त्यांना राघोबा 'भरारी' असें नांव पडलें होतें. या स्वाऱ्यांच्या पायीं पैसा अतोनात खर्च होई, आणि त्या मानानें फारशी लूट व खंडणी वगैरे मिळत नसे. यामुळें दादासाहेबांनीं बरेंच कर्ज करून ठेविलें होतें. अशा एका स्वारींत अफगाणिस्थानच्या अहमदशहा अबदालीची व त्यांची झटापट होऊन तींत अहमदशहाचा पराभव झाला होता. अहमदशहा हा मोठा मानी व कुर्रेबाज होता. त्याला ह्या आपल्या अपमानाचें उट्टें केव्हां काढीन असें झालें होतें. तो सैन्याची उत्तम प्रकारची तयारी करीत होता. मराठ्यांचें वैभव मुसलमानांच्या डोळ्यांत सलत होतें. त्यांनीं अहमदशहाला ईर्षेस चढवून त्याच्या कडून हिंदुस्थानावर स्वारी करविली. अहमदशहा स्वारीची तयारी करीत आहे हें मराठ्यांच्या गांवींही नव्हतें. त्यामुळें ते असावध होते. इतक्यांत अहमदशहा हिंदुस्थानावर चालून येत आहे अशी खबर आली. त्याच्याशीं तोंड देण्याला आपली चांगली तयारी पाहिजे म्हणून पेशव्यांनीं सगळ्या मराठे सरदारांना पत्रें पाठवून फौजे सुद्धां तावडतोब बोला-

विलें. सुमारें दोन लाख फौज जमा झाली. आतांपर्यंत स्वाऱ्या करण्याचें काम राघोबादादाकडे आणि घरीं बसून राज्याचे हिशेब ठिशेब वगैरे कारभार करण्याचें काम सदाशिवरावभाऊकडे होतें. दोघेही आपापल्या कामांत हुषार होते. पण दादासाहेबानीं कर्ज फार करून ठेविलें असें कोठें भाऊसाहेब एकदां सहज बोलून गेले. तेवढ्यावरून रागावून 'इतःपर आह्मी घरीं राहूं, तुम्हीं स्वारीला जावें' असें दादासाहेब रागानें म्हणाले. भाऊसाहेब त्या गोष्टीला कबूल झाले. याप्रमाणें रागारागाचीं भाषणें होऊन स्वारीचें काम यावेळीं भाऊसाहेबाकडे आलें, आणि दादासाहेब पुण्यास बसून कारभार पाहूं लागले.

याच सुमारास पेशवे व निजाम यांच्यामध्यें कांहीं कारणावरून तंटा उत्पन्न झाला होता. त्यामुळें भाऊसाहेबाला अगोदर निमाजाचा समाचार घ्यावा लागला. उदगिराजवळ मराठ्यांनीं निजामाच्या फौजेला चांगला मार दिला. स्वारीचें काम हातीं घेतल्यावर झालेल्या या पहिल्याच लढाईंत मराठ्यांची फत्ते झाली येवढ्यावर भाऊसाहेब शेफारले, आणि अहमदशहाशीं सामना करण्याचें काम मोठेंसें कठीण नाहीं असें त्यांना वाटूं लागलें.

खरोखर तें काम कांहीं सोपें नव्हतें. अहमदशाहा स्वतः शूर होता, व त्याचे लोक कडवे, मजबूत आणि

लढण्याच्या कामांत तयार होते. आणखी हिंदुस्थानांतल्या सगळ्या मुसलमानांची त्याला चांगली मदत होती. मराठ्यांचेंही सैन्य मोठें होतें, व तयारीही बरी होती. अशा वेळीं कोणी हुषार माणूस मराठ्यांच्या सेनापतीच्या जागीं असता, तर मराठ्यांना जय मिळाला असता. भाऊसाहेब शूर होते. पण पदरच्या सरदारांना खूष ठेऊन त्यांचेवर आपली छाप बसविण्याचें व त्यांचे कडून उत्साहानें कामगिरी करवून घेण्याचें चातुर्य त्यांचें अंगीं नव्हतें. शिवाय ते मोठे हेकेखोर असत. कोणाचें ऐकावयाचें नाहीं, आपलाच हेका चालवावयाचा, अशी त्यांना खोड होती. त्यामुळें त्यांच्या हातून मोठाल्या चुका झाल्या. त्यांनीं अहमदशहाला अलीकडे येऊं दिलें. एकदम हल्ला न करतां कित्येक महिने एके ठिकाणीं फौज कोंडून ठेविली, होळकरासारख्या वृद्ध व इमानी सरदाराचा अपमान केला, व मराठ्यांची जुनी लढण्याची पद्धत एकदम सोडली. या चुकांचा परिणाम फार वाईट झाला. पानिपत येथें झालेल्या या लढाईंत मराठ्यांचा पुरा मोड झाला, नानासाहेबांचा वडील मुलगा विश्वासराव पडला; तो पडल्याबरोबर भाऊसाहेब गर्दींत घुसले व तेही दिसेनासे झाले. दोघेही मालक गेले, तेव्हां मराठ्यांचा धीर सुटून ते पळत सुटले. मुसलमानांनीं मागें लागून हजारों मराठ्यांची कत्तल केली. बुंदेले, मेहेंदळे, इब्रा-

हिमखान गारदी व शिंद्याच्या वंशांतले दोघे पुरुष असे अनेक सरदार या लढाईंत मारले गेले. दमाजी गायकवाड, व मल्हारराव होळकर यांनीं अगोदरच पळ काढला होता. महादजी शिंद्याच्या पायाला एका गिलच्यानें मोठी जखम केली होती. तेही कसेबसे ग्वालेरला गेले. नाना फडणीस हे या लढाईंत होते. ते कसे तरीं जीव घेऊन दक्षिणेंत येऊन पोंचले. ही लढाई इ० स० १७६१ मध्यें झाली.

ही पराजयाची बातमी ऐकून नानासाहेबांची कंबर खचली व साऱ्या महाराष्ट्रांत जिकडे तिकडे शोकाचा ध्वनि ऐकूं येऊं लागला. नानासाहेब लवकरच मरण पावले. त्यांना तीन मुलगे होते. वडील मुलाचें नांव विश्वासराव. हा पानिपतच्या लढाईंत मारला गेला. मधला माधवराव ( याला रावसाहेब म्हणत ) व धाकटा नारायणराव. हे दोघेही पुढें पेशव्याचे गादीवर बसले.

---

## गोष्ट १२ वी—थोरले माधवराव पेशवे.

नानासाहेबांच्या मागें त्यांची गादी माधवरावाला मिळाली. मराठ्यांच्या इतिहासांत माधवराव या नांवाचे दोन पेशवे झाले. एक हा व दुसरा याचा भाऊ जो नारायणराव त्याचा मुलगा. हा वडील म्हणून याला थोरले माधवराव म्हणत.

माधवरावाला पेशव्याचीं वस्त्रें मिळालीं, तेव्हां तो

लहान—सोळावर्षांचा—होता. म्हणून त्याचे चुलते राघोबादादा यांनीं कांहीं दिवस राज्यकारभार चालविला. या सुमारास निजामाशीं लढाई करण्याचा प्रसंग आला, निजाम हा पेशव्यांचा पिढीजाद शत्रु होता. तो कांहीं ना कांहीं खुसपट काढून, लढाईचा प्रसंग आणी. मागें नानासाहेबांचे वेळीं उदगीर येथें भाऊसाहेबानीं त्याचा पराभव केला होता, तेव्हांपासून त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर याच्या मनांत पेशव्या विषयीं खुमखुमी होतीच. त्यानें पेशवा लहान आहे, व ही लढाईला चांगली संधी आहे असें पाहून आणि युक्तीनें पटवर्धनांचें साह्य मिळवून एकदम पुण्यावर चाल केली, आणि पुणें शहर अर्धवट जाळून राक्षस—भुवनाजवळ फौजेचा तळ दिला. मराठ्यांनीं त्यांना लवकरच गांठिलें. दादासाहेब स्वतः लढाईला पुढें झाले; पण दुर्दैवानें शत्रूच्या हातांत सांपडले. हें पाहून माधवराव लहान होते तरी हिंमत धरून पुढें झाले, आणि सैन्यांतल्या लोकांस उत्तेजन देऊन पंधरा हजार स्वारांनिशीं काकास सोडविण्यासाठीं निघाले. येवढ्याशा मुलाची ही छाती पाहून होळकरासारख्या वृद्ध सरदारांना शरम वाटली आणि त्यांनीं मोगल सैन्यावर हल्ला करून त्याची दाणादाण केली. विठ्ठल सुंदर ठार झाला; काकाची सुटका झाली; मराठ्यांचे नांव राहिलें.

माधरावाची बुद्धि चलाख व स्वभाव तापट होता.

काकांनीं सगळी सत्ता स्वतःच्या हातांत ठेविली, आपणांस कांहीं अधिकार दिला नाहीं, हें त्याला खपलें नाहीं. पण कारभाराची चांगली माहिती होईपर्यंत तो गप बसला आणि मग काकाला बरीच मोठी जहागिर देऊन त्याला त्यानें स्वस्थ बसण्यास सांगितलें व आपण स्वतः कारभार पाहूं लागला.

माधवराव फार पाणीदार, आणि शिस्तीचा माणूस होता. सर्वांवर त्याचा चांगला दरारा असे. माधवराव स्वतः कारभार पाहूं लागला हें दादासाहेबांना रुचलें नाहीं; आणि शिवाय पेशव्याच्या कडकपणाच्या वर्तनाला त्रासलेले कांहीं दरबारी होतेच. त्यांनीं दादासाहेबांना पुढें करून पेशव्याशीं वाकडेपणा धरला. मग निजाम व नागपूरकर भोंसले यांच्याशीं पेशव्यांच्या विरुद्ध कारस्थानेंही त्यांनीं चालविलीं. हें कळलें तेव्हां दादासाहेबांना मोकळें राहूं देणें धोक्याचें वाटून पेशव्यांनीं त्यांना अटकेंत ठेविलें.

माधवराव व दादासाहेब यांच्यांतल्या या भांडणाचा परिणाम पुढें फार वाईट झाला. आजपर्यंत पेशव्यांच्या घरांत इतक्या उघड रीतीनें कधीं फूट झाली नव्हती, ती आतां झाली. आतां पेशव्यांचे दरबारीं उघड उघड दोन पक्ष झाले. एक माधवरावाचा व दुसरा दादासाहेबांचा. या दोन पक्षांतला द्वेषाग्नि बरेच दिवस धुमसत




सर्वांत मोठा पेशवा

राहिला, आणि शेवटीं त्यांनेंच मराठ्यांचे राज्याचा नाश केला, वगैरे हकीकत पुढें येणारच आहे.

---

## गोष्ट १३ वी—याचें 'नांव बाणेदारपणा !

रावसाहेबाच्या (माधवरावाच्या) अंगच्या बाणेदारपणाविषयींच्या पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यांतल्या निवडक एक दोन तुम्हांला येथें सांगतों.

रावसाहेब स्वत: फौजेनिशीं कर्नाटकांत मोहिमेवर गेले होते. तेथें त्या वेळीं हैदर नांवाच्या मुसलमान राजाचें राज्य होतें. त्याची सैन्याची तयारी चांगली होती. मराठ्यांच्या मनांतून येतागिरी किल्ला घ्यावयाचें आलें. त्यांनीं त्याला वेढा दिला, आणि सारखे दोन महिने मराठे किल्ल्याला मोर्चे लावून बसले; पण किल्ला हातीं लागेना. असे आणखी किती दिवस बसणार ? मराठे कंटाळले. एकदां निकराचा हल्ला करून सोक्ष कीं मोक्ष करून घ्यावा—किल्ला तरी हस्तगत करून घ्यावा, नाहीं तर वीराला उचित असें युद्धांतलें मरण तरी पतकरावें,—अशा निश्चयानें रावसाहेब हातांत ढाल तलवार घेऊन निघाले. मालकाचा हा निश्चय पाहून मराठ्यांची फौजही निघाली. इतक्यांत मराठ्यांचा हल्ला येत आहे ही बातमी किल्ल्यावर जाऊन पोहोंचली, व शत्रूकडचे लोक सावध झाले. त्यांनीं किल्ल्यावरून तोफांचा मारा सुरू केला. बंदुका, तोफा, व जेजाला यांच्या गोळ्यांचा

पर्जन्य पडूं लागला. हें पाहून सर्वांनीं श्रीमंतास ( पेशव्यास ) विनंति केली कीं, ' महाराज, वरून गोळ्यांचा वर्षाव होत आहे, यासाठीं सरकारानीं हल्ल्यांत येऊं नये. ' आपले लोक हातावर शीर घेऊन लढत असतां आपण स्वतःचा जीव वाचविण्यासाठीं दूर राहावें व तेथून सारा तमाशा पहावा हें त्या पाणीदार पेशव्याला कसें रुचणार ? त्यानें ती सूचना करणारांना झिडकारून टाकलें आणि म्हटलें, ' गोळी लागून मरावयाचा असलों तर घरीं बसून वाचेन कीं काय? ' हें धन्याचें बाणेदारपणाचें उत्तर ऐकून मराठ्यांना लढण्याला मोठें अवसान आलें. ते मोठ्या निकरानें लढले. ' जो गोळा लागून पडला, त्याला मागें ओढून टाकावा आणि पुढें चालावें, या प्रमाणें हल्ला सरकारचा चालला. दहा हजार मनुष्य ठार झालें. हल्ला निघाल्यापासून बारावे घटकेस किल्ल्यावर जाऊन भगवा झेंडा लाविला ' असें या प्रसंगाचें वर्णन बखरींत आहे.

दुसरा एक छोटासा प्रसंग सांगण्यासारखा आहे. रावसाहेब आपला धाकटा भाऊ नारायणराव यासह एकदां दरबारांत बसले होते. जवळ सरदार मंडळी होती. इतक्यांत लष्करांतला एक हत्ती मोकळा सुटला, आणि नीट दरबारच्या डेऱ्यावर चालून आला. तेव्हां सगळे लोक भिऊन सैरावैरा पळत सुटले. त्यांच्याबरोबर नारायणरावही उठून जाऊं लागले. तेव्हां रावसाहेबांनीं

त्याचा हात धरून बसविलें, आणि म्हटलें, ' नारायणा, तुझ्याविषयीं अखबारनवीस ( इतिहास लिहिणारे) काय म्हणतील ?' हा त्यांचा आपसांतला संवाद ऐकून जवळच्या लोकांना भिऊन पळाल्याबद्दल शरम वाटली, आणि त्यांतल्या दोघांनीं न डगमगतां मोठ्या शिताफीनें हत्तीला मागें परतविलें. आपल्याविषयीं इतिहासकार काय म्हणतील ? हें वाक्य डोळ्यां पुढें ठेवून जर सगळे वागतील तर आणखी काय पाहिजे ? हें वाक्य ध्यानांत ठेवणाराच्या हातून वाईट कृत्य कधींच व्हावयाचें नाहीं.

---

## गोष्ट १४ वी—सर्वांत मोठा पेशवा.

रावसाहेबांनीं दादासाहेबांना अटकेंत ठेविलें व शत्रूंचीं कारस्थानें चालूं दिलीं नाहींत. त्याचप्रमाणें पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा पराजय झाल्यापासून जे मराठ्यांचे शत्रु (ह्मणजे निजाम, म्हैसूरचा हैदर, मोगल वगैरे ) फार शेफारले होते, त्यांची पेशव्यानें चांगली खोड मोडली; पुष्कळ नवीन मुलुख मिळविला; पुष्कळ लूट आणून खजीना भरला; मराठ्यांचा दरारा पुनः सर्वांवर बसविला; दक्षिणेंत पटवर्धन नांवाच्या शूर ब्राह्मणांना सरदारी दिली; व बाकीच्या सरदारांना खुष ठेविलें; कोणालाही असंतुष्ट ठेविलें नाहीं; व राज्यांत प्रत्येक खात्याची नीट व्यवस्था लाविली. ते स्वतः सरळ, आणि कोणाची भीडभाड न धरणारे होते. त्यांनीं अधि-

कारी नेमिले तेही तसेच. त्यामुळें रयतेला न्याय मिळून सुख होऊं लागलें. त्या वेळीं सरकारी कामासाठीं लोकांना वेठीस ( बिगारी ) धरण्याची जुलुमाची चाल असे. ती या पेशव्यानें बंद केली. इतक्या सगळ्या गोष्टी माधवरावानें अवघ्या अकरा बारा वर्षांत केल्या.

माधवराव इ. स. १७७२ त पुण्याजवळ थेऊर म्हणून गांव आहे, तेथें क्षयरोगानें मरण पावले. त्यांची बायको रमाबाई त्यांचेबरोबर सती गेली. त्यांना मूलबाळ कांहीं नव्हतें. म्हणून त्यांनीं मरतांना दादासाहेब, मुख्य मुख्य मुत्सद्दी व सरदार यांना आपल्याजवळ बोलावून विनंति केली कीं, ‘ आतां झाल्या गोष्टी विसरा, माझ्या नारायणाला पदरांत घ्या. आणि त्याला मनापासून मदत करूं अशा शपथा घ्या, ह्मणजे मी सुखानें मरेन. ’ सर्वांनीं ती गोष्ट कबूल करून शपथा घेतल्या. या शपथा किती जणांनीं पाळिल्या व किती जणानीं मोडल्या तें पुढें लवकरच दिसून येईल.

माधवरावाचें वय लहान पण शहाणपण थोर होतें. बाळाजी विश्वनाथाचें धोरण, बाजीरावाच्या अंगची तडफ, आणि नानासाहेबांचा मुत्सद्दीपणा हे सगळे गुण त्याचे ठायीं असून निर्भीडपणा, न्यायानें वागण्याची आवड, रयतेची कळकळ, कामांतील टापटीप व शिस्त, पाणीदार स्वभाव आणि मनाचा थोरपणा हे गुण ज्यास्त होते. इतके गुण दुसऱ्या कोणत्याही

पेशव्याचे ठायीं नव्हते, व सर्व तऱ्हेनें इतकी चांगली कामगिरी दुसऱ्या कोणाच्याही हातून झाली नाहीं. म्हणूनच या माधवरावाला ' सर्वांत मोठा पेशवा ' असें इतिहासकार म्हणतात.

---

## गोष्ट १५ वी–साडेतीन शहाणे.

पेशवाईंत साडेतीन शहाणे प्रसिद्ध होते ही गोष्ट तुमच्यापैकीं पुष्कळांना ऐकून माहित असेल. हे साडे-तीन शहाणे माधवरावाच्या वेळेपासून उदयाला येऊं लागले होते. म्हणून त्यांचेविषयीं दोन शब्द तुम्हांला येथें सांगितले पाहिजेत.

सखारामबापू, देवाजीराव चोरघडे व विठ्ठल सुंदर असे तीन शहाणे पुरुष पेशवाईंत प्रसिद्ध होते. यांतला प्रत्येक सबंध शहाणा व बाळाजी जनार्दन उर्फ नाना-फडणीस हे अर्धे शहाणे मिळून साडेतीन शहाण्यांची बेरीज त्या काळीं होत असे. या पहिल्या तीन सबंध शहाण्यांचीं नांवें लक्षांत रहावीं म्हणून एका कल्पक माणसानें त्यांच्या नांवांचीं पहिलीं दोन दोन अक्षरें घेऊन ' सख्या, देवा, विठ्ठला ' असें पद बनविलें आहे. नांवें लक्षांत राहण्यास ही युक्ति चांगली आहे.

पहिले सखारामबापू बोकिल हे नुसते सखाराम-बापू किंवा बापू याच नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. शिवाजी महाराजांनीं अफजुलखानास मारलें

तेव्हां जे गोपीनाथपंत त्यांच्या उपयोगीं पडले होते त्यांचेच बापू हे वंशज होते. त्यामुळें मुत्सद्दीपणाचा गुण त्यांच्या अंगीं पिढीजाद होता असें म्हणतां येईल. बापू खरोखर फार शहाणे व धूर्त होते. आपापसांतल्या भांडणांत तिसऱ्याला घालून राज्याचें वाटोळें करणें ठीक नाहीं असा त्यांनीं एकदां स्पष्ट अभिप्राय दिला होता. नानाफडणविसासारखे शहाणे मुत्सद्दी बापूजवळ पुष्कळसा शहाणपणा शिकले. यावरून बापूंना सबंध शहाणे म्हणण्याचा प्रघात पडला. बापूचे अंगीं शहाणपणा खरोखर पुष्कळ होता; पण त्याचा दुरुपयोग फार झाला. त्यांनीं कांहीं दिवस दादासाहेबांचा पक्ष धरला होता. त्यामुळें त्यांच्या शहाणपणाचा फायदा मराठी राज्याला न मिळतां उलट त्याच्या नुकसानीला मात्र तो कारण झाला.

दुसरे देवाजीपंत चोरघडे. यांचें मूळ नांव दिवाकर पंडित. हे देशस्थ ब्राह्मण होते. हे उत्तम गाणारे होते. यांनीं आपल्या उत्कृष्ट गायनानें प्रथम रघोजी भोंसल्याची मर्जी प्रसन्न करून त्यांचा आश्रय संपादला. पुढें जानोजी भोंसल्यानें त्यांच्या अंगची हुषारी पाहून त्यांना वकील नेमिलें. हे मोठे चतुर होते. यामुळें पेशव्यांच्या दरबारीं महत्वाच्या कामावर नेहमीं यांची वकील ह्मणून नेमणूक होत असे. निजाम, इंग्रज व पेशवे या सर्वांचीं संधानें ओळखून व त्यांवर बारीक

वृद्ध हिंदु राजाचा असा हा दीनवाणा निरोप ऐकून बाजीराव पेशव्याला त्याची दया आली, आणि तो मोग-लांची खोड मोडण्यासाठीं स्वतः धांवत गेला. शत्रूवर एकदम तुटून त्यानें त्याची चांगली खोड मोडली, व स्वारीचा खर्च आणि बुंदेलखंडाकडे तोंड फिरविणार नाहीं अशी कबुली त्याचेपासून घेतली. आपली बाजू संभाळल्याबद्दल छत्रसाल राजानें बाजीरावाला आपल्या दोघा मुलांच्या बरोबरीनें राज्याचा तिसरा हिस्सा देऊन वाटेला लाविलें. या मुलुखाच्या बंदोबस्ताचें काम पेश-व्यानें गोविंदपंत खेर याच्याकडेस सोंपविलें. हा गोविंदपंत बुंदेलखंडांत बरींच वर्षें राहिल्यामुळें गोविंदपंत बुंदेले या नांवानें पुढें प्रसिद्धीला आला, व पानपतच्या जंगी युद्धांत पडला. हाच झांशीच्या गा-दीचा मूळ पुरुष.

---

## गोष्ट ६ वी—वसईचा मोहरा.

बाजीरावाला एक धाकटा भाऊ होता. त्याचें नांव चिमाजीअप्पा. बाजीरावासारख्या वीराला खराखरा भाऊ शोभण्यासारखा हा शूर होता. बाजीरावानें जसा उत्तर हिंदुस्थानांत, तसा अप्पासाहेबानें कोंकणांत, मोठा परा-क्रम करून कीर्ति मिळविली. त्या प्रांतांत फिरंगी ( पो-र्तुगीज ) लोकांची मोठी सत्ता होती. या फिरंगी लोकांनीं हिंदूंना फार छळलें, त्यांचीं देवळें भ्रष्ट केलीं, देवांच्या

नजर ठेवून ते हुषारीनें वागत. यामुळें या सर्वांच्या दरबारीं त्यांचें वजन फार असे

तिसरे विठ्ठल सुंदर. हे स्वतः ब्राह्मण होते तरी आपल्या अंगच्या गुणामुळें निजामासारख्या मुसलमान राजाचे मुख्य दिवाण झाले होते. यांनीं निजामाच्या राज्याचा कारभार फार हुषारीनें आणि इमानानें चालविला होता. थोरले माधवरावाचे वेळीं मराठ्यांची निजामाशीं राक्षसभुवन येथें लढाई झाली, तिला कारण हेच होते. याच लढाईंत थोरले माधवरावांनीं त्यांचें डोकें कापून नेलें.

याशिवाय नाना फडणवीस हे अर्धे शहाणे होते. यांचें खरें नांव बाळाजी जनार्दन भानु. पेशवाईच्या अखेरीपर्यंत यांचा शहाणपणाविषयीं मोठा लौकिक होता. हे सन १७६१ मध्यें झालेल्या पानपतच्या लढाईंत होते. नंतर लवकरच ते राज्यकारभारांत पडले. ते सन १ ०० मध्यें मरण येईपर्यंत तेंच काम करीत होते. थोरले माधवराव पेशव्यांचे मागें मराठ्यांचें राज्य व नांवलौकिक संभाळण्याची मोठी जबाबदारी त्यांचेवर येऊन पडली होती. तींतून ते चांगल्या रीतीनें पार पडले, व 'खूप शर्तिनें राज्य राखिलें यशवंत फडणिस नाना' असा त्यांनीं लौकिक संपादिला. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दी नंतरचा इतिहास म्हणजे नाना फडणिसाच्या मुत्सद्दीपणाचा इतिहास आहे. यावेळीं

महादजी शिंदे हे जबरदस्त पुरुष त्यांच्या उलट पक्षाला होते. त्यांच्या सामन्याची हकीकत पुढें येईलच.

## गोष्ट १६ वी—या वेळचीं कांहीं ठळक माणसें.

बाळाजी विश्वनाथाच्या वेळेपासून आतांपर्यंतचा काळ मुख्यतः तरवारीचा होता. याच्या पुढचा काळ मुत्सद्दी-गिरीचा आला. आतांपर्यंत नवीन मुलुख जिंकून आपलें राज्य वाढविण्याकडे मराठ्यांचें लक्ष होतें. या पुढें आपलें राज्य व मिळविलेली अब्रू ही संभाळण्याकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें होतें. ही पुढची वेळ मोठ्या आणीबाणीची होती. कारण, पेशव्यांच्या घरांत दादा-साहेब व त्यांची बायको आनंदीबाई यांच्यामुळें तंटे लागले होते, व सरदारांचेंही आपापसांत असावें तसें सूत नव्हतें. यामुळें मराठ्यांचें राज्य संभाळण्याचें काम फार कठीण होऊन बसलें होतें. पण सुदैवानें यावेळीं कांहीं हुशार व मुत्सद्दी माणसें पेशवाईत होतीं, त्या-मुळें मराठी राज्याचा बचाव झाला. या पैकीं कित्येक माणसें थोरल्या माधवरावाच्या वेळीं नुकतीं उदयाला येऊं लागलीं होतीं. त्यांचे विषयीं तुम्हांला पुढें पुष्कळ गोष्टी ऐकावयाला मिळतीलच. पण त्या गोष्टींचें खरें मर्म ध्यानांत येण्याला त्यांचेविषयीं थोडीशी तरी माहिती या ठिकाणीं तुम्हांला करून दिली पाहिजे. साडेतीन शहाण्यांची गोष्ट तुम्हीं नुकती ऐकलीच आहे.

आतां अहिल्याबाई होळकर, महादजी शिंदे, जीवबा-दादा बक्षी, हरीपंत फडके, रामशास्त्री प्रभुणे, त्रिंबक-रावमामा पेठे, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे मंडळी-विषयीं चार शब्द सांगतों.

१ अहिल्याबाई—ही मल्हारराव होळकरांची सून व मल्हारावाचा मुलगा खंडेराव याची बायको. मल्हारराव जिवंत असतांना खंडेराव कुंभेरीच्या वेढ्यांत तोफेचा गोळा लागून मेला. त्यावेळीं ही बाई सती जाणार होती, पण सासऱ्याच्या विनवणीवरून राहिली. ही बाई अत्यंत धार्मिक, दानशूर आणि साध्वी ह्मणून प्रसिद्ध आहे. हिनें प्रत्येक क्षेत्राचे व तीर्थाचे ठिकाणीं धर्मशाळा, कुंड, घाट, देऊळ, तलाव वगैरे कांहींना कांहींतरी लोकांच्या उपयोगाचें कृत्य केलें आहे. ही जशी रयतेला पोटच्या मुलाप्रमाणें ममतेनें वागवि-णारी, तशीच तेजस्वीही होती. तिच्या वाटेस जा-ण्याची कोणाची छाती नव्हती. तिच्याविषयीं त्या वेळच्या मुसलमान व रजपूत राजांचीही फार पूज्यबु-द्धि असे, व ते तिला फार मान देत. ही महेश्वर येथें इ. स. १७९५ मध्यें मरण पावली.

२ महादजी शिंदे—शिंद्यांचा मूळ पुरुष राणो-जी याची थोडीशी हकीकत पहिले बाजीरावाविषयीं सांगतांना मीं तुम्हांस सांगितली होती. त्याचे तीन मुलगे मारले गेल्यामुळें त्याच्या मागें त्याचा मुलगा

महादजी हा शिंद्याच्या गादीवर बसला. हा पानिपतच्या लढाईंत लंगडा होऊन परत आला होता. हा मोठा बुद्धिमान्, शूर व धोरणी होता. नाना फडणिसासारख्याशीं राजकारस्थानांत तोड करणें व कवाईत शिकून तयार झालेल्या इंग्रजांच्या पलटणीवर लढाईंत जय मिळविणें या दोन्ही गोष्टी सामान्य नव्हत्या; पण त्या महादजीनें केल्या. याविषयीं तुह्मांला पुढें पुष्कळ सांगावयाचें आहे. या वेळीं महादजी शिंदे नुकते चमकूं लागले होते.

३ जिवबादादा बक्षी—हे सांवतवाडीकडचे सारस्वत ब्राह्मण ( शेणवी ) असून महादजी शिंद्यांचे वेळीं त्यांचे मुख्य सेनापति व सल्लागार होते. राजपुताना, माळवा, पंजाब वगैरे मुलुखांत त्यांनीं आपली तरवार चांगली गाजविली होती. पुढें खर्ड्यांचे लढाईच्या व इंग्रजांशीं झालेल्या लढायांच्या वेळीं त्यांची पेशव्याला मदत फार झाली. महादजी शिंद्याचे ते उजवा हात होते असें म्हटल्यास चालेल. हे इ. स. १७९६ त मरण पावले.

४ हरिपंत फडके—हे प्रथम पुण्यास एका सावकाराचे पदरीं कारकून होते. पण आपल्या अंगच्या गुणांनीं चढत चढत शेवटीं ते पेशव्यांचे सेनापति झाले. राज्याची व्यवस्था नीट लावण्याचे कामीं हे थोरल्या माधवराव पेशव्यांच्या फार उपयोगीं पडले

होते. यांच्यावर पेशव्यांची मोठी कृपा असे. हे जसे धूर्त तसे शूरही होते. म्हणून पेशव्यांचे मुख्य जरीपटक्याचें निशाण संभाळण्याचें अतिशय जोखमीचें काम त्यांचेकडेस देण्यांत आलें होतें.

**५ रामशास्त्री प्रभुणे**—हे प्रथम शागिर्द होते. पण केवळ गुणांच्या जोरावर थोरले माधवराव पेशव्यांचे वेळीं मुख्य न्यायाधीश झाले. त्यावेळीं गुणाला किती मान होता हें या उदाहरणावरून चांगलें दिसतें. रामशास्त्री अतिशय करारी, निस्पृह, निर्भीड, शुद्ध आचरणाचे आणि खराखरा न्याय देणारे होते. यामुळें त्यांचें वजन खुद्द पेशव्यावर सुद्धां फार असे. ज्या स्थितींत जें कर्तव्य योग्य तेंच त्यावेळीं केलें पाहिजे, भलतें केलें असतां अधर्म घडतो असें त्यांचें मत होतें. म्हणून माधवराव पेशवे एकदां नाक धरून स्नानसंध्या करीत बसलेले पाहून यांनीं त्यांनां स्पष्ट सांगितलें कीं, स्नानसंध्या करावयाची असली तर माझ्या बरोबर काशीस चला; येथें राहून पेशव्याचें—क्षत्रियाचें—प्रजेचें रक्षण करण्याचें—काम करावयाचें असलें, तर संध्येला थोडाबहुत फांटा दिला पाहिजे. तसेंच पुढें राघोबादादाच्या हुकुमानें गारद्यांनीं नारायणराव पेशव्याला ठार मारिलें, तेव्हां ‘ तुम्हांला या पातकाबद्दल देहांत प्रायश्चित्त पाहिजे ’ असें सांगून व अशा पापी राज्यांत राहणें नको असें ह्मणून ते काशीस

चालते झाले. ब्राह्मणांनीं अल्प वेतनावर संतुष्ट रहावें व कर्तव्य ह्मणून राज्याचे उपयोगीं पडावें हा जो त्यांचा धर्म तो खरोखर रामशास्त्र्यांनीं पाळला होता.

६ **परशुरामभाऊ पटवर्धनः**—हे व यांचे भाऊ हे मूळचे यःकश्चित् भटाभिक्षुकाचे मुलगे, पण पुढें पेशव्यांचे पदरचे शूर सरदार ह्मणून प्रसिद्धीला आले. कर्नाटकांत ह्मैसूरकर आणि कोल्हापूरकर यांनीं पेशव्यांचे मुलुखावर नेहमीं स्वाऱ्या करून रयतेस त्रास द्यावा. तो बंद करण्याचे कामीं हे पटवर्धन सरदार फार उपयोगीं पडत. परशुरामभाऊंनीं अनेक बिकट प्रसंगीं मोठ्या धैर्यानें व शौर्यानें लढून पेशव्यांची बाजू संभाळली होती. सवाई माधवरावाच्या मृत्यू-नंतर झालेल्या धांदलींत यांनीं कांहीं दिवस पेशव्या-च्या दिवाणगिरीचें कामही केलें होतें. सन १७९९ मध्यें पट्टणकुडी येथें कोल्हापुरकराशीं जी जंगी लढाई झाली, तींत शत्रूकडच्या पांच वीरांनीं एकदम घाला घालून त्यांना जखमी केल्यामुळें ते मरण पावले. ब्राह्मण सरदारांत यांच्यासारखे वीर फार थोडे झाले असतील. सध्यां दक्षिण महाराष्ट्रांत सांगली, मिरज, कुरुंदवाड, जमखिंडी वगैरे जीं संस्थानें आहेत, तेथील संस्थानिक या पटवर्धन बंधूंचेच वंशज आहेत.

## गोष्ट १७ वी—ही सारी भाऊबंदकी !

माधवराव पेशव्यांनीं मरतांना नारायणरावाला दादासाहेब, सखाराम बापू, नानाफडणीस वगैरे मंडळीच्या पदरांत घातलें होतें, आणि त्यांनींही त्याला पेशवा करून इमानानें राज्य राखण्याविषयींच्या शपथा घेतल्या होत्या. त्याप्रमाणें त्यांनीं नारायणरावाला पेशवाईचीं वस्त्रें मिळवून दिलीं. पण लवकरच दादासाहेबांचें मन त्यांची बायको आनंदीबाई हिच्या सांगण्यावरून पालटलें, आणि नारायणरावाला बाजूला सारून आपण पेशवा व्हावें अशी त्यांना इच्छा झाली. ती पूर्ण करण्याची युक्तिही त्यांना सांपडली. त्यांनीं सुमेरसिंग व दुसरे गार्दीलोक ( हत्यारबंद शिपाई ) यांना नऊ लक्ष रुपये देऊं करून आपलेसें करून घेतलें व ‘ नारायणरावाला धरावें ’ असा हुकूम त्यांचे हातीं दिला. आनंदीबाईनें त्या हुकुमांत ‘ध’च्या ठिकाणीं ‘मा’ हें अक्षर घातलें. एकच अक्षर फिरविलें, पण त्यामुळें केवढा अनर्थ झाला पहा ! गार्द्यांनीं भर दिवसां वाड्यांत शिरून दंगा केला आणि नारायणरावाला ठार मारलें.

या भयंकर पापकर्मामुळें दादासाहेबांची चोहोंकडे छीःथूः झाली. नानाफडणीस, सखाराम बापू व हरिपंत फडके यांनीं देवाला स्मरून आणाशपथा केल्या कीं नानासाहेबांचा वंश चालवावयाचा आणि दादा-

साहेबांच्या वंशाला नमस्कारसुद्धां करावयाचा नाहीं. पुण्यांतली सगळी मोठमोठी मुत्सद्दी मंडळी आतां दादासाहेबावर उलटली. नारायणराव मारला गेला हा पेशव्यांच्या घरांत सुरू झालेल्या भाऊबंदकीचा पहिला परिणाम. ही गोष्ट इ. स. १७७३ मध्यें घडली.

---

## गोष्ट १८ वी—बारभाईचें कारस्थान.

लोभ म्हटला म्हणजे वाईटच. त्यांतून राज्य-लोभ तर फारच वाईट. हा राज्यलोभ नसता, तर प्रत्यक्ष पुतण्याला मारविण्याची बुद्धि दादासाहेबांना कशाला झाली असती ? ज्या पेशव्याच्या पदासाठीं त्यांनीं एवढें घोर कृत्य करविलें तें तरी त्याचेकडे फार दिवस राहिलें ह्मणावें, तर तेंही नाहीं. दादासाहेबांना साताऱ्च्या छत्रपतीकडून पेशव्यांचीं वस्त्रें मिळालीं, पण तीं त्यांना फार दिवस लाभलीं नाहींत. निजाम, हैदर वगैरे शत्रु गडबड करूं लागले म्हणून दादासाहेब फौज घेऊन पुण्याबाहेर पडले. इकडे सखारामबापू, नाना-फडणीस, फडके वगैरे मंडळीनें ( बारभाईनीं ) दादा-साहेबांच्या विरुद्ध कारस्थान चालविलें. नारायणराव मारले गेले तेव्हां त्यांची बायको गंगाबाई गरोदर होती. तिला मुलगा होईल अशा भरवशावर गंगाबाईच्या नांवानें तूर्त राज्यकारभार करावयाचा असा विचार करून त्यांनीं गंगाबाईला पुरंदर किल्ल्यावर सुरक्षित ठिकाणीं

नेऊन ठेविलें. ही मसलत बाराजणांची होती म्हणून हिला 'बारभाईचें कारस्थान' म्हणतात. भरंवशाप्रमाणें बाईला मुलगा झाला, तेव्हां सर्वांना अतिशय आनंद झाला. मुलाचें नांव माधवराव ठेविलें. त्याच्या नांवचीं पेशवाईचीं वस्त्रें सातार्‍याहून आणिलीं आणि दादासाहेबांना बंडखोर ठरवून त्यांचा हुकूम कोणी ऐकूं नये अशीं पत्रें उघडपणें सगळ्या सरदारांना पाठविण्यांत आलीं. इतकेंच नाहीं, तर हरिपंत फडक्यांचे हाताखालीं दादासाहेबांवर फौजही पाठविण्यांत आली.

दादासाहेब तेव्हां स्वारींत होते. त्यांना ही हकीकत कळली, तेव्हां ते लागलींच मोहीम बंद करून परत फिरले. वाटेंत संधि साधून पेठ्यांनीं (हे दादासाहेबांच्या बरोबर गेलेले होते) त्यांचेवर हल्ला केला. त्यांत पेठे स्वतः मारले गेले. वाटेंत फडके भेटले. त्यांनीं दादासाहेबांचा पराभव करून त्यांना माळव्यांत पिटाळून लाविलें. तेथें शिंदे, होळकर त्यांना आश्रय देईनात, तेव्हां ते सुरतेस इंग्रजाकडे निघून गेले. वाटेंत धारच्या किल्ल्यांत आनंदीबाई प्रसूत होऊन मुलगा झाला. पेशवाई बुडविणारा दुसरा बाजीराव तो हाच.

---

## गोष्ट १९ वी—टोपीवाले.

इंग्रजलोक पहिल्यानें इकडे आले, तेव्हां त्यांना टोपीवाले म्हणत. हे टोपीवाले इंग्रज व्यापार करून

पैसा मिळविण्याच्या हेतूनें आले होते खरे; पण पुढें त्यांना अनेक कारणांमुळें राजे लोकांच्या भांडणांत पडावें लागलें. या इंग्रजांनीं आपल्या मालाच्या वखारीच्या रक्षणासाठीं स्वतःजवळ थोडीशी फ़ौज ठेविली होती. ही फौज चांगली कवाईत शिकलेली व तयार असे. आपणांस मराठे सरदारांकडून मदत मिळेलसें दिसत नाहीं असें पाहून दादासाहेबांना वाटलें कीं, आतां आपणांस जर कोणी मदत करतील तर ती इंग्रजच करतील. म्हणून ते इंग्रजांकडे मदत मागण्याला गेले, आणि आपणांस राज्य मिळवून दिल्यास १९ लक्षांचा मुलूख देण्याचें त्यांनीं कबूल केलें. आपसांतल्या भांडणांत परक्याचा हात शिरकूं देणाऱ्या खुळ्या दादासाहेबांचें हें स्वतःच्या नाशाचें कृत्य पाहून नानाफडणिसासारख्या शहाण्या माणसांना फार राग आला. मराठी राज्यावर दादासाहेबांनीं हें नवें संकट आणिलें आहे हें त्यांनीं लागलींच ओखळलें आणि फौज पाठवून आरास येथें इंग्रजांचा पराभव केला. मुंबईकर इंग्रजांनीं दादासाहेबांना मदत दिली हें कलकत्तेकर इंग्रज अधिकाऱ्याला (गव्हर्नरजनरलला) आवडलें नाहीं. त्यानें पुणें दरबाराशीं तह कण्याकरितां कलकत्त्याहून एक अधिकारी पुण्यास पाठविला. या अधिकाऱ्यानें येऊन पुरंदर येथें कारभारी मंडळीशीं तह केला. या तहाप्रमाणें इंग्रजांना दादासाहेबांचा पक्ष सोडावा लागला

व त्याबद्दल त्यांना साष्टी वगैरे मुलुख मिळाला, आणि दादासाहेबांनीं तीन लक्षांची नेमणूक घेऊन कोपरगांवीं स्वस्थ असावें असें ठरलें. हा तह इ० स० १७७६ मध्यें झाला. पण मुंबईच्या इंग्रजांनीं विलायतेस इकडची सर्व हकीकत लिहून कळविली, आणि दादासाहेबांना मदत करण्याचा हुकूम आणिला. याच वेळीं पुण्याच्या दरबारीं एका फ्रेंच माणसाचें बरेंच प्रस्थ माजलें होतें. फ्रेंच हे इंग्रजांचे शत्रु असल्यामुळें पुण्याच्या कारभारी मंडळीनें पुरंदरच्या तहाच्या अटी पाळल्या नाहींत असें म्हणण्याला इंग्रजांना आयतेंच निमित्त मिळालें. त्यांनीं लढाईची तयारी केली. इंग्रजांचें सैन्य कवाईत शिकलेलें होतें. त्यांच्याशीं तोंड देण्याला आपल्याही सैन्याला कवाईत आली पाहिजे म्हणून नानांनीं फ्रेंच लोकांना सैन्यांत भरलें. तेव्हां इंग्रज व पेशवे यांच्यांत पुनः लढाईचा प्रसंग आला.

---

## गोष्ट २० वी–' आणरे माझी तलवार. '

हे शब्द कोणाचे असतील असें तुम्हांला वाटतें ? ते कांहीं मोठ्या माणसाचे नाहींत, तर एका अगदीं लहान मुलाच्या तोंडून एका निकराच्या प्रसंगीं निघालेले आहेत. हा मुलगा म्हणजे खुद्द सवाई माधवराव, व तो प्रसंग म्हणजे इंग्रजांच्या बरोबरच्या लढाईचा होता. या प्रसंगाची हकीकत अशी आहे कीं मागच्या

गोष्टींत सांगितल्याप्रमाणें इंग्रज व पेशवे यांचें बिनसलें आणि त्यांच्या फौजांची गांठ पुण्याजवळ वडगांव येथें पडली. या ठिकाणीं त्यांच्या चार चकमकी झाल्या. चारींत इंग्रजांची सरशी झाल्याचें वर्तमान पुरंदरास पेशवे होते तिकडे गेलें. महादजी शिंदे व फडके या लढाईत होते. त्यांचा विचार ठरला कीं, उद्याची लढाई मोठ्या शर्तीची करावयाची. दुसरे दिवशीं लढाईला सुरुवात झाली. तोफाशीं तोफा चालूं लागल्या. पायदळानें बंदुकांचा मारा सुरूं केला. लढाई निकराची झाली. इंग्रजांचा सेनापति इष्टुर फाकडा ( कप्तान स्टुअर्ट ) दुर्बीण लावून पहात असतां एका मराठा गोलंदाजानें निशाण धरून तोफेच्या गोळ्यानें पाडला. तेव्हां इंग्रजांची दाणादाण झाली. इंग्रज पळूं लागले, मराठे मागें लागले. अगोदर इंग्रजांची सरशी झाली होती, तेव्हांची बातमी पुरंदरला गेली होती. ती ऐकून नाना, बापू वगैरे मंडळी खिन्न होऊन बसली होती. श्रीमंतांनीं कारण पुसलें, तेव्हां इंग्रज भारी आहे हें चिंतेचें कारण कळलें. तें ऐकून श्रीमंत जवळच्या खिजमतगारास म्हणाले, 'काय इंग्रज मोडत नाहीं ? आणरे माझी तलवार !' इतकें बोलून उठून उभे राहिले, आणि तलवार फिरवून म्हणाले 'इंग्रज ठार झाला.' इतक्यांत स्टुअर्टसाहेब मारला गेल्याची खबर जासूद घेऊन आला. मराठ्यांचा जय झाल्याची बातमी ऐकून सर्वांना

आनंद झाला. तोंडें सुकलीं होतीं ती पुनः टवटवीत दिसूं लागलीं.

वडगांव येथें इंग्रजांची अशी दुर्दशा झाली, तेव्हां महादजी शिंद्याचे मार्फत त्यांनीं तेथें पेशव्याशीं तह ठरविला. ( १७८२ ) या तहामुळें इंग्रजांना दादासाहेबांचा पक्ष कायमचा सोडून द्यावा लागला. दादासाहेब तीन लक्षांची नेमणूक घेऊन कोपरगांवला जाऊन राहिले. तेथें ते सन १७८३ मध्यें मरण पावले.

---

## गोष्ट २१ वी—दोन थाटाचे समारंभ.

इंग्रजांशीं तह झाला, तेव्हां दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष देण्यास मराठ्यांना फुरसत सांपडली. इंग्रजांशीं मराठ्यांचें युद्ध चाललें आहे ही संधि साधून म्हैसूरच्या वाघानें ( टिपूला 'म्हैसूरचा वाघ' म्हणत असत ) मराठ्यांच्या मुलखावर झडप घातली होती. त्याच्या शिकारीला आतां मराठे वीरांना जाण्याला सापडलें. त्यांनीं टिपूची खोड मोडून त्याच्यापासून आपला मुलूख परत मिळविला, आणि वर लढाईच्या खर्चाबद्दल तीस लक्ष रुपये घेतले.

याच वेळीं उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंद्यानें रजपूत, रोहिले व जाट यांना चांगला हात दाखवून दिल्लीपर्यंत आपला प्रताप गाजविला. या वेळीं तेथें गुलाम कादर नांवाचा एक अत्यंत क्रूर रोहिला बादशहा

शहाआलम याला छळीत होता. या गुलाम कादरानें बादशहाला सिंहासनावरून फराफरा खालीं ओढून पाडलें, आणि बादशहाजवळ त्याला देण्याला पैसे नव्हते ह्मणून कट्यार भोसकून त्याचे डोळे काढले होते ! अशा दुष्टाला महादजी शिंद्यानें पकडून ठार मारलें. तेव्हां बादशहा त्याचे उपकार स्मरून त्याला आपल्या वजीरातीचा ( मुख्य प्रधानाचा ) मान देऊं लागला. पण शिंद्यानें तो स्वतःला न घेतां आपले धनी पेशवे यांना देवविला. दिल्लीहून आणिलेलीं या मानाचीं वस्त्रें पेशव्यांस देण्यासाठीं महादजी मोठ्या थाटानें पुण्यास आले. पण नानाफडणिसांना हें आवडलें नाहीं. त्यांचें असें म्हणणें होतें कीं, आपण मराठे श्रीशिवाजीमहाराजांचे वेळेपासून मुसलमानांस शत्रु समजत आलों. आपले मालक सातारचे छत्रपति महाराज, आणि पेशवे त्यांचे प्रधान. असें असतां आतां त्या मुसलमानांची वजीरी पेशव्यांनीं पत्करणें यांत भूषण नसून उलट हलकेपणा आहे. नानांचें हें म्हणणें मराठ्यांच्या अभिमानाला शोभणारें होतें. पण शिंद्यांना तें आवडलें नाहीं. ते पेशव्यांच्या कानाशीं लागले. सवाई माधवरावांची अजून पोरबुद्धि होती. त्यांना पाचपेंच व पुढील धोरण कमी होतें. ते शिंद्यांच्या विचाराला अनुकूल झाले. दिल्लीहून आणिलेला मानमरातब घेण्यासाठीं त्यांनीं थाटाचा दरबार केला. यापुढें पेशव्यापाशीं शिंद्यांचें प्रस्थ

फारच वाढलें. नंतर लवकरच होळीचे दिवस आले. रंगपंचमीचे दिवशीं शिंद्यांचें सांगण्यावरून श्रीमंत रंग खेळले. हा समारंभ इतका थाटाचा झाला कीं, पुण्यांत रस्तोरस्तीं गुलालच गुलाल पडला होता ! रस्त्याचे दोन्ही बाजूंचे घरांतून रंगाचे हंडे ठेवून श्रीमंतांची स्वारी जातांना त्यांचे अंगावर रंग उडविण्यांत आला. येथेंच राज्याचा रंग झाला, आतां पुढें राज्याला वाईट दिवस येणार, असे उद्गार कित्येक शहाण्या लोकांनीं त्या वेळीं काढले होते. त्याप्रमाणें लवकरच घडून आलेंही.

---

## गोष्ट २२ वी.—नानाचा कारभार.

या वेळीं राज्याचा सगळा कारभार नाना पहात होते. इकडे इंग्रज, तिकडे निजाम अल्ली, व पलीकडे कर्नाटकांत हैदर, इतक्या सगळ्या शत्रूंच्या हालचालींवर बारीक नजर ठेवावयाची, खुद्द मराठे सरदारांत आपापसांत जीं कारस्थानें चालत त्यांवर लक्ष ठेवून सावध रहावयाचें, कोणाला शिरजोर होऊं द्यावयाचें नाहीं, किंवा बंडाळी करूं द्यावयाची नाहीं, राज्याचें उत्पन्न वाढतें ठेवून प्रजेला सुख लागेल अशा गोष्टी करावयाच्या, आणि त्याच वेळीं छोट्या पेशव्यांच्या शिक्षणाकडेही पूर्ण लक्ष ठेवावयाचें, अशा शेंकडों गोष्टी एकावेळीं करण्याची जबाबदारी नाना फडणिसावर या वेळीं येऊन पडली होती. पण नाना फार हुशार, व्यव-

स्थित, शिस्तीनें वागणारे आणि वेळचेवेळीं काम करणारे होते; यामुळें त्यांचीं सगळीं कामें बिनबोभाट होत. नानांची बातमी काढण्याची शिकस्त होती. निजाम, हैदर, इंग्रज या सर्वांच्या कडच्या अत्यंत गुप्त गतम्या देखील त्यांना अतिशय त्वरेनें कळत. पण त्यांच्या अंगांत पुष्कळ चांगले गुण होते, तसे कांहीं ठळक दुर्गुणही होते. त्यांचें दुसऱ्याशीं नेहमीं कडकपणाचें वर्तन असे. प्रत्येक बाबतींत हिशेबीपणा ठेवण्याची त्यांना संवय लागली होती. दुसऱ्याच्या हरएक कृत्याविषयीं ते शंका घेत; आणि आपल्या मर्जीतल्या माणसानें कितीही गैरशिस्त वर्तन केलें तरी नाना तिकडे ढुंकून बघत नसत. खुद्द पुण्यांत—पेशव्यांच्या राजधानींत—नाना फडणिसांचे देखत घाशीराम कोतवालानें लोकांना अतिशय उपद्रव दिला, छळलें, आणि शेवटीं कांहीं तेलंगी ब्राह्मणांना खोलींत कोंडून क्रूरपणानें मारलें, तरी नाना फडणिसाला त्याची जणूं काय बातमीच नव्हती ! शेवटीं श्रीमंतांच्या कानावर ही गोष्ट गेली. तेव्हां त्यांनीं माणसें पाठवून कोंडलेल्या ब्राह्मणांना सोडविलें, आणि घाशीरामाची धिंड काढून त्याला ब्राह्मणांकडून ठार मारविलें.

नानांच्या हातीं राज्याचा सगळा कारभार होता ही गोष्ट मराठे मुत्सद्यांपैकीं पुष्कळांना रुचली नाहीं. सखाराम बापू व मोरोबादादा फडणीस (नानांचे चुलत

भाऊ ) यांनीं तर एकदां त्यांची उचलबांगडी करण्या-चाही कट केला होता. पण नाना सावध होते. त्यांनीं कटांतल्या मंडळींस कैद करून दूर नेऊन ठेविलें. महादजी शिंद्यालाही पेशव्यांचा कारभार आपण पहावा अशी या वेळीं इच्छा झाली होती. त्यांचें श्रीमंतांजवळ चांगलें वजन होतें. शिवाय शिंद्याजवळ फौजफाटाही पुष्कळ होता. त्यामुळें शिंदे नानांना डोईजड झालेले होते. शिंद्यानीं एकदां आपली इच्छा श्रीमंताचे जवळ बोलून सुद्धां दाखविली होती, पण ‘ नाना माझा उजवा हात आणि तुम्ही डावा हात आहां ’ असें श्रीमंतांनीं स्पष्ट उत्तर केल्यामुळें त्यांचें तोंड बंद झालें. नानांचें आणि महादजींचें वांकडें येण्याला हें एक मोठें कारण झालें होतें. हरिपंततात्या फडक्याच्या मध्यस्थीनें त्यांच्यांत पुढें समजूत झाली होती; पण यानंतर महादजी शिंदे फार दिवस जगले नाहींत. ते १७९४ या वर्षीं पुण्याजवळ वानवडी येथें मरण पावले. यांनीं फार मोठी संपत्ति व वैभव हीं मिळविलीं होतीं. तरी त्यांची राहणी फार साधी असे. ‘ पाटीलबुवा ’ ह्मणवून घेण्यांत त्यांना भूषण वाटे. त्यांना मूलबाळ नव्हतें, ह्मणून त्यांच्या धाकट्या भावाचा मुलगा दौलतराव त्यांच्या मागून शिंद्याच्या गादीवर बसला. महादजी-च्या पदरीं जीवबादादा, लखबादादा वगैरे नामांकित शेणवी मंडळींचा बराच मोठा भरणा होता, व

शिंद्यांचा नांवलौकिक वाढण्याला त्यांची पुष्कळ मदत झाली होती.

---

## गोष्ट २३ वी.—मराठ्यांच्या वैभवाचा कळस.

सवाई माधवराव एकदां ह्मणाले होते कीं नाना माझा उजवा हात आणि महादजी शिंदे माझा डावा हात आहेत. यांपैकीं एक—डावा हात—गेला. आतां एका हातानें—नुसत्या लेखणी धरणाऱ्या हातानें—मराठ्यांचें राज्य कसें सांभाळलें जाणार असें निजामाला वाटलें, आणि तो कांहीं तरी खुसपट काढून पेशव्यांशीं लढाई करण्याच्या विचारांत होता. इतक्यांत एक निमित्त आयतेंच पुढें आलें. त्याच्याकडे चौथाईबद्दल दोन कोट चौसष्ट लक्ष रुपये येणे होते. नानांनीं ते मागितले. तेव्हां निजामाचा दिवाण मश्रुलमुल्क यानें उर्मटपणाचे जाब दिले. इतकेंच नाहीं, तर रात्रीं तमाशांत पेशवे व नाना यांचीं सोंगें आणवून गोविंदराव काळे (पेशव्यांचे वकील) यांचे देखत त्यांचा अपमान केला. तेव्हां काळ्यांनीं तेथल्या तेथें रागानें सांगितलें कीं 'आपले कडील दिवाणाला पुण्यास नेऊन दारोदार फिरवून याचें उसनें फेडीन तरच नांवाचा काळे.' झालेला प्रकार काळे यांनीं नानाला कळविला, तेव्हां निजामाशीं युद्ध करावें लागलें. नानांनीं सगळ्या मराठे सरदारांना आपापल्या फौजेनिशीं बोलावलें, व तेही येऊन मिळाले. पण नानांनीं अशी युक्ती

केली कीं आपली फौज किती आहे तें अखेरपर्यंत निजामाला कळूं दिलें नाहीं. मराठ्यांची फौज पुण्याहून निघाली, आणि पन्नास कोसांवर खर्डे येथें उतरली. निजामाचीही फौज तेथें आली. लढाईला सुरवात झाली. मराठ्यांचा तोफखाना व बाण यांचा मारा सुरू झाला. तोफांचे गोळे व बाण यांच्या वर्षावामुळें निजामाचे घोडेस्वार घाबरून गेले, आणि खर्ड्याच्या गढींत शिरले. तेव्हां मराठ्यांनीं गढीला वेढा दिला, आणि तोंडावर तोफांचा मारा चालू ठेविला. निजामाचा जनानखाना बाहेरच हत्तीवर राहिला होता. ते हत्ती मराठ्यांचे हातीं लागले; पण नानांनीं त्याला सुखरूपपणें निजामाकडे पोंचविलें. याचें नांव थोरपणा! निजामानें वकिलाचे हातीं आपली शिक्केकटार श्रीमंतांकडे पाठविली व सोबत निरोप पाठविला कीं. 'जो मुलूख घ्यावयाचा असेल तो ठेवून घ्यावा.' यांत निजामाचाही थोरपणा दिसला. पेशवे व नाना दोघेही स्वतः या लढाईंत हजर होते. त्यांनाही निजामाचें हें वर्तन पाहून संतोष वाटला. नानांनीं त्याला सांगून पाठविलें कीं, आम्हांला दुसरें कांहीं नको. आमची रक्कम आम्हांला द्यावी व तिची फेड होईपर्यंत तुमचे दिवाण मश्रुल्मुल्क यांस आमचेकडे पाठवावें. ही दुसरी अट कबूल करणें निजामाच्या जिवावर आलें. ही स्वारी अभिमानाकरितां मराठ्यांनीं केली होती. मुलुखाच्या

किंवा पैशाच्या लोभामुळें नव्हती. ह्मणून मश्रुल्मुल्काला स्वाधीन केल्याखेरीज दुसरी कोणतीही गोष्ट ऐकण्यास नाना तयार नव्हते. अखेर निजामाला त्यांचें म्हणणें कबूल करावें लागलें. सवाई माधवराव व नाना या दोघांनीं मश्रूल्मुकाशीं फार उदारपणाचें वर्तन ठेविलें. त्याचें मोठ्या थाटानें स्वागत केलें, आणि त्याच्या दर्जाला शोभेल असा इतमाम त्याच्यापाशीं ठेविला.

या खर्ड्याच्या लढाईंत शिंद्याचे सेनापति जिवबादादा बक्षी यांनीं मोठा पराक्रम केला होता. शिंद्याच्या तोफा, व भोसल्यांचे बाण, होळकरांचा भाला, व पटवर्धनाची तलवार यांच्या मुळेंच या लढाईंत मराठ्यांची फत्ते झाली. या लढाईच्या वेळीं मराठ्यांचें वैभव व सत्ता हीं पूर्ण कळसाला जाऊन पोचलीं असें ह्मणत असत. कारण, मराठ्यांची इतकी फौज पुनः कधीं एकत्र झाली नाहीं, व मराठ्यांच्या नांवलौकिकासाठीं सगळे एकदिलानें पुनः कधीं लढले नाहींत. यापुढें जो तो सरदार आपापलें हित साधण्यांत गढून राहिला. यामुळें मराठी राज्याचा मुख्य पाया ह्मणजे एकी तो खचला. एकदां पाया खचल्यावर वरली इमारत फार दिवस टिकून राहत नाहीं. जितकी उंच इमारत असेल तितकी लवकर ती कोसळते. हाच अनुभव पेशवाईला यापुढें वीस पंचवीस वर्षांत आला.

## गोष्ट २४ वी.—आकस्मिक प्रसंग.

पानिपतच्या लढाईंत मराठ्यांची जेवढी हानि झाली, तेवढी किंबहुना त्याहून मोठी अशी हानि या वेळीं अकस्मात् झाली. पेशवाईंतली बहुतेक सगळीं कर्तबगारीचीं माणसें या सुमारास मरण पावलीं. सखाराम बापू, महादजी शिंदे व हरिपंत तात्या फडके नुकतेच वारले होते. अहिल्याबाई सन १७९५ मध्यें वारली. न्यायाचे कामीं कोणाची भीड न धरणारे निःस्पृही रामशास्त्रीबोवा प्रभुणे हेही थोडेसे अगोदर गेले. शूर आणि राजकारणी सेनापति जिवबादादा हेही वारले. राहतां राहिले नाना फडणीस आणि परशुराम भाऊ पटपर्धन. हेही पुढें लवकरच आटोपले. पण त्यापूर्वीं खुद्द पेशव्यांच्या घराण्यावर दुर्दैवानें अकस्मात् एक मोठा घाला घातला. त्याची गोष्ट सांगितली पाहिजे.

सवाई माधवरावाचें शिक्षण नानांचे देखरेखी खालीं उत्तम प्रकारें चाललें होतें. लहानपणापासून-च रोज नेमानें तालीम करून शरीर मजबूत करणें, धटिपणा व प्रसंगावधान हे गुण अंगीं आणणें वगैरे गोष्टींचा नाद त्यांना लावण्यांत आला होता. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या बखरी त्यांचेकडून वाचून घेण्यांत येत. याशिवाय दरबारांत त्यांना राजकारणाची प्रत्यक्ष माहिती करून देण्यात येत असे. माधवरावही शिकण्याचे कामांत आपली हुषारी दाखवीत. यावरून लवकरच

ते आपला कारभार स्वतः पाहूं लागतील अशी उमेद वाटूं लागली होती. पण इतक्यांत महाराष्ट्राचें दुर्दैव आड आलें. नानांचें लक्ष माधवरावांच्या शिक्षणाकडे जसें होतें तसेंच त्यांना कोणाची संगत लागली आहे, त्यांच्याशीं कोण काय बोलतो, कोणाशीं त्यांचा पत्र-व्यवहार चालतो वगैरे गोष्टींवरही त्यांची बारीक नजर असे. मोठ्या लोकांपाशीं त्यांच्या मनाजोगें बोलणारे व हांजी हांजी करणारे हलकट लोक असतातच. यजमान पोरवय असला ह्मणजे त्यांना अधिकच फावतें. तुह्मी मालक असून तुमची काडी इतकी सत्ता नाहीं, सगळा अधिकार कारभाऱ्यांनीं लबाडीनें आपले हातीं ठेविला आहे, आणि तुम्हांला कैदेंत ठेविलें आहे, असें हळूं हळूं कांहीं लोक पेशव्याच्या डोक्यांत भरवूं लागले.

माधवराव खुळा! त्याला तें खरेंच वाटलें आणि त्याचें डोकें भणाणून गेलें. तशांत रघुनाथराव दादासाहेबांचा मुलगा बाजीराव हा शिवनेरी किल्ल्यांत कैदेंत होता. त्यानें नानांना न कळूं देतां माधवरावाशीं गुप्त रीतीनें पत्रव्यवहार सुरू केला. हा बाजीराव मोठा गोडबोल्या व खटपटी होता. त्याच्या अंगीं खरी कर्तबगारी किंवा खरें शहाणपण मुळींच नव्हतें. त्याच्याशीं गुप्त पत्रव्यवहार होतां होतां माधवरावाला त्याचें अगदीं वेड लागलें. बाजीराव हा दुर्गुणी व

उरलीं नव्हतीं. मराठी राज्याच्या हिताकडे न पाहतां स्वतःच्या मतलबाकडे दृष्टि देण्याची खोड सरदारांना लागलेली होती. दादासाहेबांचे चिरंजीव बाजीराव याची आपणांस गादी मिळावी यासाठीं अटोकाट खटपट चालली होती. इकडे इंग्रज पेशव्यांचे कारभारांत हात शिरकविण्याची संधी पहातच होते. असें पेशवाईचें आकाश या वेळीं चोहोंकडून फाटत चाललें होतें. नानासारखा शहाणा व चतुर मुत्सद्दी झाला, तरी अशा स्थितींत एकटा काय करणार?

---

## गोष्ट २५ वी.—साराच गोंधळ!

बाजीराव हलक्या कानाचा, वाईट लोकांचे नादीं लागलेला, संशयी, आणि कपटी होता. हे त्याचे दुर्गुण नाना फडणिसांनीं ओळखून ठेविले होते. अशा माणसाचे हातीं मराठ्यांचें राज्य गेलें तर तो थोड्याच दिवसांत त्याचें वाटोळें करील, आणि शिवाजी महाराजाचे वेळेपासून आतांपर्यंत पावणे दोनशें वर्षें केलेली खटपट व सांडलेलें रक्त फुकट जाईल असें नानांस भय वाटलें. शिवाय दादासाहेबाच्या वंशास आपण नमस्कार करणार नाहीं, अशा शपथा घेणारांत नाना होतेच. बाजीरावाला पेशव्याची गादी मिळूं दिली तर त्याच्या पुढें चाकराच्या नात्यानें हात जोडण्याचा आणि आपण घेतलेली शपथ आपल्या हातानें मोड-

प्रसंग येणार; यासाठीं बाजीरावाला पेशवा न करतां सवाईमाधवरावाची बायको यशोदाबाई हिच्या मांडीवर एखादा मुलगा दत्तक देऊन त्याला पेशवा करावें असा नानांचा बेत होता. हा बेत त्यांनीं बाकीच्या सरदार मंडळीस कळविला, तेव्हां बहुतेकांना तो पसंत पडला. पण शिंद्याचे दिवाण बाळोबा तात्या याला बाजीरावानें आपल्याकडे वळवून घेतलें होतें. दौलतराव शिंदे पोरवय, आणि पेशव्यांच्या दरबारीं नानांचें जें वजन होतें तें पाहून त्यांच्याविषयीं मत्सरबुद्धि बाळगणारी मंडळी त्यांच्या पदरीं पुष्कळ. तेव्हां बाजीरावाचा पक्ष शिंद्यांनीं उचलला यांत आश्चर्य नाहीं. यावेळीं शिंद्याची फौज भारी होती. त्यामुळें त्यांचा दरारा फार होता पेशव्याकडे हरीपंत तात्या फडके यांच्या मागें चांगला सेनापति कोणी उरला नव्हता. अशी स्थिति पाहिली तेव्हां नानांनीं हार खाल्ली, आणि आपणच बाजीरावाला पुण्याला आणून पेशव्याच्या गादीवर बसविण्याचा विचार केला. त्याप्रमाणें त्यांनीं त्याला पुण्याला आणलें. पण बाजीरावाला गादी मिळावी अशी बाळोबा तात्याला खरी इच्छा कोठें होती? कोणीकडून तरी नानाच्या उलट पक्षाला मिळून त्यांचे बेत हाणून पाडावयाचे, आणि आपलें घोडें पुढें-ढकलावयाचें हा त्यांचा बेत! नाना बाजीरावाला मिळाल्याबरोबर बाळोबा बाजीरावाच्या उलट

गेले, आणि बाजीरावाला कैद करून चिमाजी आप्पाला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देण्याच्या उद्योगाला लागले. शिंद्याची फौज पुण्याकडे आलेली पाहून नाना भ्याले आणि सातार्‍यास पळून गेले. परशुरामभाऊनीं बाळोबाच्या सहाय्यानें चिमाजी आप्पाला पेशवा केलें. आणि नानाला कैद करण्यासाठीं सातार्‍यास माणसें पाठविलीं. नाना त्यांच्या हातांत बहुतेक सांपडले होते; पण मोठ्या युक्तीनें वांचले आणि महाडास पळून गेले. मग तेथून त्यांनीं सगळीं कारस्थानें चालविलीं.

बाजीराव नुसता गादीवर बसावयाचा तों केवढी धामधूम आणि गडबड झाली! नानांनीं आपल्या चातुर्याची शर्थ केली, पण कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, दूरदृष्टि नाहीं, मराठी राज्याचें हित पाहण्याची बुद्धि नाहीं, शिस्तीनें वागणें ठाऊक नाहीं, अशा स्थितींत ते तरी काय करतील? तरी नानाच्या चातुर्यामुळें व मश्रुलमुल्काच्या फौजेचें साह्य मिळाल्यामुळें येवढें झालें कीं, परशुराम भाऊ व बाळोबा तात्या यांचीं कारस्थानें नानांच्या पुढें लटपटलीं, आणि त्यांना पुण्यांतून पळ काढावा लागला. परशुराम भाऊ चिमाजी आप्पाला पुढें घालून पळाले व मागें पेशव्यांचें सैन्य लागलें. त्या दोघांनाही कैद करून ठेवण्यांत आलें. नानांनीं पुण्यास येऊन बाजीरावासाठीं

साताऱ्याहून वस्त्रें आणविलीं व त्याला एकदांचा पेशवा केलें (सन १७९६).

ही हकीकत मराठी राज्याचा अभिमान बाळगणारांना अतिशय दुःखदायक आणि लाजिरवाणी वाटण्यासारखी आहे यांत शंका नाहीं, ज्यांनीं मराठी राज्याचें कल्याण करणें हाच आपला एक हेतु समजून त्याकामीं एकदिलानें झटावयाचें, आणि त्यासाठीं प्राण खर्चीं घालावयाचे, त्यानींच वर सांगितल्याप्रमाणें आपलें मुख्य कर्तव्य कोणतें आहे आणि आपले वाडवडील कोणत्या प्रकारें वागले तें विसरून जावें, आणि ज्या बुद्धीचा व शक्तीचा उपयोग शत्रूचें कारस्थान हाणून पाडून त्याला जिंकण्यांत करावयाचा, त्या बुद्धीचा व शक्तीचा उपयोग एकमेकांचा पाडाव करण्याकडे करावा याहून खरोखर अधिक शरमेची गोष्ट कोणती असणार? हा सगळा दुरभिमानाचा परिणाम! जें कांहीं व्हावयाचें तें माझ्यामनाप्रमाणें व्हावें, आणि तेज पडावयाचें तें माझें पडावें, असें प्रत्येकानें म्हटलें ह्मणजे हा असा परिणाम होतो.

---

## गोष्ट २६ वी—बापाचाच कित्ता मुलानें उचलला!

बाजीरावाला पेशव्याची गादी मिळाल्याबरोबर त्यानें हलकट लोकांना भराभर मोठालीं हुद्याचीं कामें

अगदीं नालायक मनुष्य आहे, अशाची संगत माधवरावाला लागूं नये, ह्मणून नाना फार जपत होते; पण गुप्तपणें चाललेला हा प्रकार त्यांना कळला नाहीं, व जेव्हां कळला तेव्हां ते माधवरावाला त्याविषयीं कांहीं बोलले. माधवरावाला तें अर्थात् रुचलें नाहीं. त्यांना त्या बोलण्याचा राग आला. तशांत त्यांना ताप येऊं लागला. अंगांत ताप व मनाची ही स्थिति, यामुळें वायूचा झटका येऊन माधवराव आपल्या वाड्यांत खिडकीपाशीं उभे होते तेथून झोंक जाऊन खालीं चौकांत फरशीवर पडले, आणि दुखापत होऊन सन १७९५ त मरण पावले.*

सवाई माधवरावाच्या मृत्यूमुळें महाराष्ट्राचें मोठें नुकसान झालें. कारण, माधवरावाला मूलबाळ नसल्यामुळें पुढें पेशव्याच्या गादीवर कोणाला बसवावें याविषयीं मोठा प्रश्न उभा राहिला. पेशव्यांचे पदरीं पुण्यास नाना फडणिसाखेरीज दुसरीं शहाणीं माणसें कोणी

---

* नानांच्या जाचास कंटाळून माधवरावानें आत्महत्या करण्यासाठीं मुद्दाम उडी टाकली असें ग्रांटडफच्या इतिहासांत व त्यावरून लिहिलेल्या इतर पुस्तकांतून लिहिलेलें आहे. आह्मीं दिलेली हकीकत त्या वेळचे होळकर व गोविंदराव काळे यांच्या दप्तरांतल्या अस्सल पुराव्यांवरून व त्या वेळच्या वृद्ध माणसांकडून मिळालेल्या माहितीवरून लिहिलेली आहे.

सांगितलीं. रावबाजींची स्नानसंध्या व नेमधर्म हीं मोठीं होतीं, तसेंच त्यांचें दुराचरणही प्रसिद्ध होतें. दुपारपर्यंत नाक धरून बसावयाचें आणि मग नाच, तमाशा बैठका वगैरे गोष्टींच्या रंगांत दंग राहावयाचें हा त्यांचा नेम असे. राज्यकारभारांत बिलकुल लक्ष नाहीं, राज्याचें बरें होवो कीं वाईट होवो त्याची पर्वा नाहीं, आपण बरे आणि आपले व्यसनी व हलकट सोबती बरे, असें रावबाजींचें वर्तन असे. हा प्रकार पाहून नानांचें अंतःकरण करपून जाई, आणि आतां लवकर डोळे मिटतील तर बरें असें त्यांना वाटे. ईश्वरानेंही त्यांचें गाऱ्हाणें लवकरच ऐकलें. सन १८०० मध्यें नाना मरण पावले. ‘ नानाबरोबर पेशवाईतलें शहाणपण गेलें ’ असे उद्गार तेव्हांपासून ज्याच्या त्याच्या तोंडून निघूं लागले. पेशवाईचा कारभार खरोखर पाहतां येथेंच आटोपला. कारण, याच्यापुढें खरा राज्यकारभार असा झालाच नाहीं. यापुढें कोणत्याही प्रसंगीं मराठ्यांचें शौर्य, गादी विषयींचा अभिमान, जूट किंवा इमानीपणा दिसला नाहीं. उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ नाहींसा झाला; सैन्याची अव्यवस्था झाली; सरंजाम जप्त झाले; मित्र होते ते शत्रु झाले; परक्यांचा हात शिरकला; हातचा मुलुख गेला; सरदारांचे आपआपसांतले तंटे पेशव्यांनीं तोडावयाचे तें एकीकडेच राहिलें; उलट रावबाजी ते जास्तच वाढवूं लागले.

याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. शिंदे व होळकर या दोन मोठाल्या सरदारांत तंटे लागून ते एकमेकांचे मुलख लुटूं लागले, आणि ज्या तरवारी शत्रूच्या रक्तांत बुडावयाच्या, त्या आपल्याच लोकांच्या रक्तानें रंगूं लागल्या. तुकोजीराव होळकराचा मुलगा विठोजी याला बाजीरावानें हत्तीच्या पायांखालीं देऊन ठार मारिलें. त्यामुळें संताप चढून त्याचा भाऊ यशवंतराव यानें पुण्यावर चाल केली. बाजीरावाची स्वारी पळाली आणि सिंहगडावर जाऊन बसली. यशवंतरानें पुणें शहर लुटून बाजीरावाचा भाऊ अमृतराव याला पेशव्याच्या गादीवर बसविलें. रावबाजीला हें कळलें, तेव्हां ते फारच घाबरले, आणि वसईस इंग्रजांच्या आश्रयास जाऊन राहिले! बापानें घालून दिलेला कित्ता मुलानें वळविला!

---

## गोष्ट २७ वी.—जूट फोडली.

बाजीरावानें इंग्रजांशीं वसई येथें सन १८०२ मध्यें तह केला, आणि त्यांच्या साह्यानें पुनः पुण्यांत पाय ठेविला. या तहाच्या अटी शिंदे, होळकर, नागपूरकर भोसले वगैरे मराठे सरदारांना कबूल नव्हत्या. त्यांना न विचारतां पुसतां मराठ्यांचें स्वातंत्र्य नाहींसें करणारा हा तह बाजीरावानें केला होता. मराठे सरदारांत जूट नव्हती. शिंदे व होळकर यांच्यामध्यें वांकडें

आलें होतें. तथापि न जाणो ते वेळप्रसंग पाहून एक होतील तर त्यांना तसें होऊं द्यावयाचें नाहीं, जेथें जो भेटेल तेथें त्याला गांठून प्रत्येकाशीं निरनिराळें युद्ध करावयाचें असा इंग्रजांनीं विचार केला होता.

इंग्रजांनीं शिंद्याशीं आसई, आरगांव, लासवारी वगैरे ठिकाणीं लढाया करून त्याला जिंकलें व अंजनगांव येथें तह करून त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें. नागपूरकर भोसल्यांशीं तशाच प्रकारचा तह करून त्यालाही त्यांनीं आपल्या मुठींत आणून सोडिलें. याप्रमाणें या दोघांची वाट लाविल्यावर ते होळकराकडे वळले. यशवंतराव होळकर कांहीं सामान्य पुरुष नव्हता. मोठा तेजस्वी, शूर, व धाडशी होता. त्यानें कांहीं वेळ इंग्रजांपुढें टिकाव धरला पण पुढें तोही मेला, आणि त्याच्यामागें होळकराच्या राज्याची फार वाताहात झाली.

---

## गोष्ट २८ वी.–त्रिंबकजी डेंगळे.

इकडे बाजीराव सर्वस्वीं इंग्रजांच्या मुठींत होता. त्याला कोणा सरदारांशीं किंवा दुसऱ्या कोणाला त्याच्याशीं बोलावयाचें झालें तरी तें इंग्रजांच्या मार्फत बोललें चाललें पाहिजे असें वसईच्या तहांत एक कलम होतें. त्याप्रमाणें बडोद्याच्या गायकवाडाकडचें कांहीं हिशोबाचें काम घेऊन त्यांचे वकील गंगाधर शास्त्री पटवर्धन हे

बाजीरावाकडे इंग्रजांचे मार्फत आले होते. त्यांना घेऊन पेशवे पंढरपुरास गेले. तेथें एके दिवशीं कोणी दुष्टानें त्या वकिलाला ठार मारलें. हा खून पेशव्याच्या सांगण्यावरून झाला असें म्हणतात. रावबाजींचे वडील दादासाहेब यांच्या हुकुमानें मागें एक ब्रह्महत्या ( नारायणराव पेशव्याचा खून ) घडली होती. आतां त्यांच्या मुलाच्या हातून ही दुसरी घडली ! हा खून करणारा त्रिंबकजी डेंगळे नांवाचा पेशव्यांच्या मर्जींतला एक हलकट व पाजी मनुष्य आहे असा संशय इंग्रजांना येऊन त्यांनीं त्रिंबकजीला आमच्या स्वाधीन करा असें बाजीरावाला म्हटलें. नाहीं होय म्हणतां शेवटीं बाजीरावानें त्याला इंग्रजांचे स्वाधीन केलें. इंग्रजांनीं त्रिंबकजीला अगोदर ठाण्याच्या तुरुंगांत ठेविलें होतें, पण तेथून तो मोठ्या युक्तीनें पळाला. तुरुंगांतल्या कैद्यांवर गोऱ्या सोजिरांचा ( शिपायांचा ) पहारा होता. त्यांना मराठी भाषा मुळींच कळत नव्हती. हें पाहून एका मराठे शिलेदारानें गोसाव्याचें सोंग घेतलें, आणि त्रिंबकजी ज्या कोठडींत कैदेंत होता त्या ठिकाणाजवळ जाऊन त्यानें मराठींत एक गाणें म्हटलें. पाहरेवाल्या गोऱ्या शिपायाला त्या गाण्याचा अर्थ कळला नाहीं. पण त्रिंबकजीनें आंतून तें गाणें ऐकलें, आणि त्या गाण्यांतला संकेत ओळखून यःपलायन केलें. त्रिंबकजी पळाला तो पेशव्यांच्या मदतीनें, तेव्हां त्याला

धरून द्या अशी इंग्रजांनीं पेशव्याकडे निकड लाविली. बाजीरावाला या गोष्टीचा राग आला. शिंदे, होळकर व भोसले यांनींही भर दिली. तेव्हां इंग्रजांशीं युद्ध करण्याचा पेशव्याचा विचार ठरला.

---

## गोष्ट २९ वी.—पेशवाईतला शेवटला ब्राह्मण वीर.

या वेळीं पेशव्यांचे सेनापतीचें काम बापू गोखले नांवाच्या एका ब्राह्मणाकडे होतें. पेशवाईत ब्राह्मणांत हाच शेवटला वीर झाला. याचे चुलते धोंडोपंत हेही मोठे शूर होते. त्यांनीं कर्नाटकांत मोठाले पराक्रम करून पेशव्यांच्या गादीची सेवा फार इमानानें केली होती. त्यांच्याच तालमींत बापू वाढले होते. त्यामुळें बाजीरावाचें वर्तन पाहून दुसरे बहुतेक सरदार त्रिथरले होते, तरी हा पाणीदार व इमानी पुरुष आपल्या धन्याला सोडून गेला नाहीं. बाजीराव पडला अतिशय भित्रा, आणि लष्करच्या भोंवतालीं धाबळ्या, मुकटें वगैरे सोंवळीं गुंडाळा म्हणजे इंग्रजांना येतां येणार नाहीं अशी मसलत देणारी शहाणी दरबारी मंडळी! अशा स्थितींत एखादा माणूस कितीही शूर झाला तरी त्याच्यानें काय होणार आहे! पेशव्याच्या फौजेच्या इंग्रजांशीं खडकी, कोरेगांव अष्टें वगैरे ठिकाणीं लढाया झाल्या. या लढायांत आपला पराभव झालेला पाहून बाजीराव घाबरून पळत सुटला होता. शेवटीं अष्ट्याच्या लढाईंत

बापूलाही वीराला शोभणारें असें मरण आलें, तेव्हां तर बाजीरावाचा सगळा धीर सुटला, आणि शिंदेहोळकर वगैरे मराठे सरदारांकडूनही मदत मिळण्याची आशा दिसली नाहीं. तेव्हां इंग्रजांना शरण जाण्याखेरीज बाजीरावाला दुसरा मार्गच उरला नाहीं, इ. स. १८१८ मध्यें रावबाजीनें स्वतःला सालिना आठ लक्षांची नेमणूक करून घेतली, आणि इंग्रजांचे स्वाधीन सगळें राज्य करून तो ब्रह्मावर्ताला जाऊन राहिला.

पेशवाई बुडाल्यानंतर इंग्रजांनीं होळकर व नागपूरकर भोसले यांच्याकडे मोर्चा वळविला. त्यांच्या सुदैवानें यशवंतराव होळकरही यावेळीं नव्हता. तो सन १८११ मध्यें मरण पावल्यानंतर होळकरांच्या दरबारांत सगळी अव्यवस्था व बजबजपुरी माजली होती. यामुळें महीदपूरच्या लढाईंत होळकराचा पराभव करून त्याला आपल्या ताटाखालचें मांजर करून ठेवण्यास इंग्रजांना सोपें गेलें.

नागपूरकर भोसल्यांच्या दरबारींही तीच अवस्था होती. सन १८१७ मध्यें इंग्रजांनीं अप्पासाहेब भोसल्याचा सिताबर्डी येथें पराभव करून त्यालाही आपल्या मुठींत आणून सोडलें.

---

## गोष्ट ३० वी.—पेशवाईनंतर.

मुलांनो, झाली. पेशवाईची हकीकत येथें संपली.

याच्या पुढची हकीकत अगदीं थोडक्यांत सांगतां येण्यासारखी आहे. बाजीराव पेशवे सन १८५१ मध्यें ब्रह्मावर्त येथें वारले. तेव्हां त्यांची आठ लक्षांची नेमणूक बंद झाली. बाजीरावास तीन दत्तक पुत्र व दोन मुली होत्या. पैकीं धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब हे १८५७ सालच्या बंडांत सामील होते. ते नेपाळांत पळून गेले. दुसऱ्या मुलांचे वंशज अजून आहेत. मुलींपैकीं एक—बयाबाई—ग्वाल्हेर येथील सरदार बाबासाहेब आपटे यांचे येथें दिलेली अजून आहे. दुसरी कुरुंदवाडकरांचे घरीं दिली होती ती मेली. ज्या पेशव्यांनीं एका काळीं सगळ्या हिंदुस्थावर मराठ्यांच्या नांवाचा दरारा बसविला, आणि राज्याच्या घडामोडी केल्या, त्यांच्या वंशजांच्या हातांत आतां काडीइतकी सुद्धां सत्ता राहिली नाहीं. हा कालाचा महिमा !


---

## काय शिकावयाचे?

आतांपर्यंत तुम्हांला पेशवाईतल्या अगदीं ठळक ठळक तेवढ्याच गोष्टी सांगितल्या. अजून दुसऱ्या किती तरी गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आहेत! पेशवाईत जसे शूर पुरुष होऊन गेले, तशा कांहीं शूर व बाणेदार स्त्रियाही होऊन गेल्या; त्यांची हकीकत ऐकण्यासारखी आहे. त्याचप्रमाणें पेशवाईतल्या लोकांच्या चातुर्याच्या कित्येक गोष्टी फार मजेदार आहेत. पेश-

त्यांची राज्यरीत कशी होती, फड हें काय प्रकरण होतें, तेव्हां लढाईची तयारी कशी करीत, त्या काळचीं नाणी कशीं असत, नानांची शिस्त कशी असे, पेशव्यांजवळ खजीना किती असे, त्या वेळच्या शाळा कशा होत्या, लोकांची राहणी कशी असे, रयतेची स्थिति कशी होती, वगैरे शेंकडों गोष्टींची माहिती तुम्हांला अजून सांगावयाची राहिली आहे. ही सगळी माहिती हें इतिहासाचें एक अंगच आहे. नुसतीं पेशव्यांचीं नांवें किंवा लढायांच्या आणि तहनाम्यांच्या तारखा पाठ केल्या म्हणजे आपल्याला इतिहास आला असें तुम्ही समजत असाल तर ती चूक आहे. पेशवाईचा इतिहास ह्मणजे ह्या काळच्या लोकांच्या समाजाचें एकंदर चित्र. चित्रांत माणसांचा नुसता एक डोळाच काढला किंवा एक कानच दाखविला म्हणजे त्याला कोणी माणसाचें चित्र म्हणत नाहीं. तसेंच नुसतीं नांवें, तारखा, व सन पाठ केल्यानें इतिहास येतो असें कोणी म्हणणार नाहीं. जशी पेशव्यांची तशीच त्यांच्या सरदारांची, त्यावेळच्या लोकस्थितीची, चालीरीतींची, व्यवहाराची, सर्वांची माहिती पाहिजे. अशी माहिती मी एका खेपेला तुम्हांला कोठवर सांगणार ? वरचेवर तुमची भेट घेऊन माझ्यानें होईल तेवढी मी सांगेनच. पण तुम्हीही स्वतः बखरी वाचून ती माहिती मिळविली पाहिजे. आतांपर्यंत मी ज्या गोष्टी सांगि

तल्या, व तुम्हींही लक्ष लावून ऐकल्या, त्यांवरून आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत अभिमान वाटण्याजोगा चांगला भाग पुष्कळ आहे, आणि पेशवाईच्या अखेरीस अखेरीस वाईट वाटण्याजोगा भागही पुष्कळ आहे हें तुम्हांला दिसून येईल. चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टींपासून आपणांला बोध घेतां येतो. तो अवश्य घ्यावा. हातांतल्या दिव्याचा उजेड जसा अंधेरांत आपल्या पुढचा रस्ता दाखवितो, त्याप्रमाणें मागच्या इतिहासाचें ज्ञान आपला पुढचा मार्ग दाखवितें. इतिहास शिकावयाचा तो एवढ्याच साठीं. तुम्हीं आतां पेशवाईचा इतिहास ऐकला. यापासून तुमच्या पुढल्या मार्गावर पुष्कळ प्रकाश पडण्यासारखा आहे, आपल्या देशाविषयींचा व वाडवडिलांच्या नांवलौकिकाचा अभिमान धरावा, हिंमत बाळगावी, करारीपणा धरावा, तेजस्विता ठेवावी, झटून उद्योग करावा, इमानानें रहावें, दूर दृष्टी ठेवावी, नुसत्या देशाभिमानाच्या वल्गना करूं नये, अंगीं बळ आणण्याचा यत्न करावा, लहान तोंडीं मोठा घास घेऊं नये, अविचाराचें कृत्य करूं नये, अपमान सहन करूं नये, सावधगिरीनें राहावें, अविचारानें अंधारांत उडी घालूं नये, धीरानें घ्यावें, अशा अनेक गोष्टी तुम्हांला या इतिहासापासून शिकण्यासारख्या आहेत.



काकांनीं सगळी सत्ता स्वतःच्या हातांत ठेविली, आपणांस कांहीं अधिकार दिला नाहीं, हें त्याला खपलें नाहीं. पण कारभाराची चांगली माहिती होईपर्यंत तो गप बसला आणि मग काकाला बरीच मोठी जहागिर देऊन त्याला त्यानें स्वस्थ बसण्यास सांगितलें व आपण स्वतः कारभार पाहूं लागला.

माधवराव फार पाणीदार, आणि शिस्तीचा माणूस होता. सर्वांवर त्याचा चांगला दरारा असे. माधवराव स्वतः कारभार पाहूं लागला हें दादासाहेबांना रुचलें नाहीं; आणि शिवाय पेशव्याच्या कडकपणाच्या वर्तनाला त्रासलेले कांहीं दरबारी होतेच. त्यांनीं दादासाहेबांना पुढें करून पेशव्याशीं वाकडेपणा धरला. मग निजाम व नागपूरकर भोंसले यांच्याशीं पेशव्यांच्या विरुद्ध कारस्थानेंही त्यांनीं चालविलीं. हें कळलें तेव्हां दादासाहेबांना मोकळें राहूं देणें धोक्याचें वाटून पेशव्यांनीं त्यांना अटकेंत ठेविलें.

माधवराव व दादासाहेब यांच्यांतल्या या भांडणाचा परिणाम पुढें फार वाईट झाला. आजपर्यंत पेशव्यांच्या घरांत इतक्या उघड रीतीनें कधीं फूट झाली नव्हती, ती आतां झाली. आतां पेशव्यांचे दरबारीं उघड उघड दोन पक्ष झाले. एक माधवरावाचा व दुसरा दादासाहेबांचा. या दोन पक्षांतला द्वेषाग्नि बरेच दिवस धुमसत

आपलें काम करील असें वाटून त्यांनीं त्याला सैन्य देऊन पाठविलें. बाळाजीनें पिंगळ्यांची सुटका केली इतकेंच नाहीं, तर खुद्द आंग्र्याला महाराजांच्या पक्षाला वळवून आणिलें. ही मोठीच कामगिरी बाळाजीपंतानें केली आणि तिच्याबद्दल महाराजांनीं त्याला पेशव्याचें काम संतोषानें दिलें. बाळाजीपंत कोंकणांतून आले, तेव्हां त्यांनीं बरोबर आपले मित्र बाळाजीपंत भानु यांस आणिलें होतें. पेशव्याचें मोठें पद मिळाल्यावर बाळाजी विश्वनाथ आपल्या मित्राला विसरले नाहींत. त्यांनीं त्याला आपल्या हाताखालीं फडनिशीचें काम दिलें.

पेशव्याचें काम मिळाल्यावर बाळाजीपंतांनीं शाहूचे शत्रु युक्तीयुक्तीनें नाहींसे केले. कोणीं सरदारानें दंगा केला, ह्मणजे शक्ति असल्यास त्याला दडपून टाकावें किंवा तितकी शक्ति नसली तर युक्तीनें त्याला आपलासा करून घ्यावा, अशा रीतीनें त्यांनीं मोठ्या शहाणपणानें राज्यकारभार केला. एकदां तर खुद्द दिल्लीवर स्वारी करून जाण्याचा प्रसंग त्यांना आला. तो असा-दिल्लीच्या बादशहाचे दरबारांत या वेळीं दोघा सय्यद बंधूंचें प्रस्थ फार माजलें होतें. ते करतील ती पूर्व दिशा होती. बादशहाचें त्यांचेपुढें चालेनासें झालें होतें. ही स्थिति बादशहाला आवडेना. तेव्हां त्यानें त्यांतल्या एका सय्यदाला दक्षिणच्या सुभेदारीवर पाठविलें, आणि त्याला ठार मारण्याविषयीं तिकडच्या दुसऱ्या एका